# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**शुक्रवार, दिनांक २१ जुलै, २०२३ / आषाढ ३०, १९४५ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | |
| **(२)** | **उप मुख्यमंत्री** | |
| **(३)** | **सहकार मंत्री** | |
| **(४)** | **महसूल, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विकास मंत्री** | |
| **(५)** | **वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(६)** | **कृषी मंत्री** | |
| **(७)** | **रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री** | |
| **(८)** | **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** | |
| **(९)** | **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५६**

---

**खारघर (नवी मुंबई) येथे आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र भूषण पुरस्कार कार्यक्रमादरम्यान झालेल्या दुर्घटनेबाबत**

**(१) * १९१०५ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अंबादास दानवे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.आमश्या पाडवी, श्री.सुनिल शिंदे, श्री.सचिन अहिर, ॲड.अनिल परब, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खारघर (नवी मुंबई) येथे आयोजित करण्यात आलेल्या मा.आप्पासाहेब धर्माधिकारी यांना महाराष्ट्र भूषण प्रदान कार्यक्रमादरम्यान उष्माघातामुळे आणि चेंगराचेंगरीमुळे २० अनुयायांचा मृत्यू झाला असून, सुमारे ५० नागरिक जखमी झाल्याची बाब दिनांक १६ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुरस्कार सोहळयासाठी लाखोंच्या संख्येने उपस्थित असलेल्या नागरिकांसाठी खानपान, उन्हापासून निवारा, मंडप आदी कोणतीही सोयीसुविधा करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यासाठी शासनाने नेमलेल्या सनदी अधिकाऱ्यांच्या एकसदस्यीय समितीस नागरिकांनी व प्रसारमाध्यमांनी विरोध करुन त्याऐवजी सेवानिवृत्त न्यायधिशांमार्फत चौकशी करुन दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नोंदवावा व दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी २० लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात यावी अशी मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, तदनुषंगाने सोहळयासाठी आलेल्या नागरिकांना सोयीसुविधा पुरविणे आवश्यक असताना त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या आयोजकांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याबाबत व दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी २० लाख रुपयांची आर्थिक मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) सदर कार्यक्रम सोहळयांनतर घडलेल्या दुर्घटनेमध्ये १४ अनुयायांचा मृत्यू झाला.
(२) सदर सोहळयासाठी लाखोंच्या संख्येने उपस्थित अनुयायांसाठी पाणी, वैद्यकीय सेवा, प्रथमोपचार किट, रुग्णवाहिका, सुलभ शौचालय, दळणवळण व्यवस्था, वाहनतळ, मैदान साफसफाई, कार्यक्रम सुकरपणे पाहता यावा यासाठी ३० मोठ्या एलईडी स्क्रीनची व्यवस्था इ. आवश्यक सोयीसुविधा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या.
(३) सद्य:स्थितीत दिनांक २० एप्रिल, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये खारघर, जि.रायगड येथे "महाराष्ट्र भूषण" पुरस्कार सोहळयानंतर झालेल्या या दुर्दैवी घटनेच्या संदर्भातील वस्तुस्थिती तपासण्याकरीता महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव यांची एक सदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे.
(४) खारघर, जि.रायगड येथे "महाराष्ट्र भूषण" पुरस्कार सोहळयानंतर झालेल्या या दुर्दैवी घटनेच्या संदर्भातील वस्तुस्थिती तपासणीची कार्यवाही एकसदस्यीय समितीमार्फत सुरु असून समितीच्या विनंतीनुसार दिनांक १३ जुलै, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये पुढील एक महिन्याकरीता मुदतवाढ देण्यात आली आहे.

मृत्यू झालेल्या १४ व्यक्तींच्या कुटुंबियांना प्रत्येकी रुपये ५.०० लक्ष याप्रमाणे एकूण रुपये ७०.०० लक्ष इतके अर्थसहाय्य मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून एक विशेष बाब म्हणून करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात केळी विकास महामंडळ स्थापन करण्याबाबत

**(२) * १९६२४ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ७४ हजार हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर केळी लागवड होत असून, केळीचे उत्पादन ४९ लाख टन असून जळगाव, सोलापूर, नांदेडसह ९ जिल्ह्यात केळी उत्पादक शेतकऱ्यांची संख्या अधिक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दर्जेदार केळीचे उत्पादन आणि निर्यातवाढीला प्रोत्साहन देण्यासाठी शेतकऱ्यांच्या मागणीनुसार मा.मुख्यमंत्री महोदयांनी जळगाव जिल्ह्याच्या दौऱ्यादरम्यान केळी विकास महामंडळ स्थापन करण्याबाबत केलेल्या घोषणेनुसार प्रस्ताव कृषी विभागाकडून शासनाकडे पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावाचे स्वरूप व मंजुरीबाबतची सद्य:स्थिती काय आहे तसेच केळी विकास महामंडळ स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) स्मार्ट प्रकल्पांतर्गत स्थापन करण्यात येत असलेल्या केळी पीक परिषदेचे उद्देश व त्याअंतर्गत समाविष्ट बाबी विचारात घेवून केळी विकास महामंडळाचा प्रस्ताव अंतिम करण्याची कार्यवाही कृषी आयुक्त स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी येथील तत्कालीन अप्पर जिल्हाधिकारी यांनी आर्थिक गैरव्यवहार केल्याप्रकरणी त्यांचेविरूध्द कारवाई करणेबाबत

**(३) * १९०९८ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी येथील तत्कालीन अप्पर जिल्हाधिकारी यांनी अवैध वाळू उपसा, कुळ प्रकरणे, इनामी जमिनी, सुनावणी व इतर आर्थिक गैरव्यवहार केल्याप्रकरणी विभागीय चौकशीचा फेर प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना शासनाने दिनांक ०३ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना दिल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर चौकशी पूर्ण करण्यास जाणीवपूर्वक दिरंगाई करून दोषींना पाठीशी घालण्यात येत असलेबाबत परभणी येथील सामाजिक कार्यकर्ते यांनी मा.मुख्यमंत्री (मुख्यमंत्री कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी) यांच्याकडे लेखी तक्रार नोंदविली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय हे खरे आहे.
(२), (३) व (४) चौकशी पूर्ण करण्यास जाणीवपूर्वक दिरंगाई करून दोषींना पाठीशी घालण्यात येत असलेबाबत परभणी येथील सामाजिक कार्यकर्ते यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना केलेले निवेदन मुख्यमंत्री सचिवालय कार्यालयास प्राप्त झालेले नाही.

-----------------

## राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातीमधील “राजपूत भामटा” जमातीच्या आरक्षणविषयक मागण्यांबाबत

**(४) * १९१४० श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातीमध्ये समावेश असलेल्या “राजपूत भामटा” या जमातीतील “भामटा” हा शब्द वगळण्यात येईल, अशी घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक १४ मे, २०२३ रोजी औरंगाबाद येथील जाहीर सभेत केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आश्वासनामुळे राजपूत भामटा, बंजारा, लमाण, कैकाडी, मसणजोगी, माकडवाले, नंदीबैलवाले, अस्वलवाले, छप्परबंद यासारख्या जमातीचे आरक्षण धोक्यात येण्याची शक्यता असून विमुक्त ‘अ’ गटातील आरक्षणावर अतिक्रमण होत असल्याच्या तक्रारी शासनाकडे आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राजपूत भामटा या समाजाची लोकसंख्या राज्यात अत्यल्प असून राजपूत भामटा नसलेल्या अनेक व्यक्तींनी खोटया प्रमाणपत्राच्या आधारावर आरक्षण मिळविल्याच्या तक्रारीबाबत तसेच भटके विमुक्तांच्या ‘अ’ आणि ‘ब’ गटातील अत्यंत मागासलेल्या जमातींना संरक्षण देणे, त्यांच्या आरक्षणावरील अतिक्रमण थांबविणे आणि त्यांच्या शैक्षणिक आर्थिक विकासासाठी कार्यक्रम आखणे या आणि अन्य मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे असून प्राप्त तक्रारी तपासून योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मॅट्रिकपूर्व व मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती अदा करण्यात येते. तसेच परदेशात उच्च शिक्षणासाठी गुणवंत ५० विद्यार्थ्यांना परदेशी शिष्यवृत्ती अदा करण्यात येते. विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी मुलांसाठी १ व मुलींसाठी १ प्रमाणे शासकीय वसतिगृहे भाड्याच्या इमारती घेऊन सुरु करण्याचा निर्णय झाला आहे. विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या व्यक्तींना व्यवसाय व स्वयंरोजगारासाठी वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत अर्थसहाय्य योजनेद्वारे कर्ज वितरित करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) येथे अनधिकृत गोदामे मोठ्या प्रमाणात असल्याबाबत

**(५) * १९६३२ ॲड.अनिल परब, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.आमश्या पाडवी, श्री.सुनिल शिंदे, श्री.सचिन अहिर, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथे हजारो अनधिकृत गोदामांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे आदेश महसूल विभागाने दिले असून जिल्हा प्रशासनाकडे या गोदामांची नोंद नसल्याने हजारो अनधिकृत गोदामे असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त परिसराचा विकास करण्याचे सर्व अधिकार एमएमआरडीएकडे असताना सन २००९ पूर्वीच्या परवानग्या दाखवून गोदाम माफिया व भ्रष्ट अधिकारी यांच्या संगनमताने अनधिकृतपणे गोदामांची बांधकामे करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व चौकशीच्या अनुषंगाने गोदाम माफिया व भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई तसेच अनधिकृत गोदामे निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) अंशतः खरे आहे.

भिवंडी तालुक्यात एकूण २४० गावे असून त्यापैकी ६० गावे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे नियोजन प्राधिकारी असलेल्या कार्यक्षेत्रात आहेत व उर्वरीत गावांसाठी प्रादेशिक विकास योजना अस्तित्वात आहे. जिल्हाधिकारी यांनी ठाणे जिल्ह्यातील विविध नियोजन प्राधिकारी यांचे कार्यक्षेत्रात येणाऱ्या रहिवासी इमारतींचे मान्सुनपुर्वी पाहाणी करुन नियमानुसार स्ट्रकचरल ऑडीट किंवा नियोमोचित कार्यवाही करणेबाबत दिनांक ०८/०५/२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये सूचित केले होते.

जिल्हाधिकारी नियोजन प्राधिकारी असलेल्या प्रादेशिक योजना परीसरात सर्व्हेक्षण करुन अंदाजे ७० ते ७२ संकुलनात साधारणतः ५२५ तसेच मुंबई महानगरविकास प्राधिकरण, भिवंडी-परिसरात ४४३ अनधिकृत गोदामे असल्याचे आढळून आले आहे.

(२) हे खरे नाही.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण नियोजन प्राधिकारी असलेल्या परिसरातील नियोजन आराखड्यास सन २०१५ मध्ये मंजुरी मिळालेली आहे. तत्पुर्वी या परिसरात भिवंडी निजामपुर महानगरपालिका यांचे क्षेत्र वगळता प्रादेशिक योजना अस्तित्वात होती. त्यावेळी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता चे कलम ४४ अन्वये प्राप्त होणाऱ्या अर्जावर प्रादेशिक विकास योजनेत अनुज्ञेय वापरासाठी आदेश देण्यात आलेले होते.

(३) भिवंडी तालुका व परिसरातील मुंबई महानगरविकास प्राधिकरण, भिवंडी-परीसर अधिसुचित क्षेत्र, अंबरनाथ-कुळगांव बदलापुर व परीसर अधिसुचित क्षेत्र, कल्याण ग्रोथ सेंटर व प्रादेशिक योजनेमध्ये अतंर्भुत उर्वरीत ग्रामीण क्षेत्र या परीसरात असणाऱ्या अनधिकृत बांधकामे एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) त्यातील तरतुदी व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १४३ अन्वये मार्गदर्शक तत्वे याचा एकत्रित विचार करुन अनधिकृत बांधकामे प्रशमन शुल्क (Compounding charges) आकारुन मुदतबध्द सवलतीचे दर आकारुन सामोपचाराने निकाली काढणेसाठी धोरण जाहीर केलेले आहे. त्यानुषंगाने या परीसरातील असणारी अनधिकृत गोदामांची बांधकामे नियमानुकुल करणेबाबत जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सर्व संबंधितांना नोटीसीव्दारे कळविण्यात आले आहे व त्यांच्यामार्फत होणाऱ्या अर्जावर सहायक संचालक नगररचना ठाणे यांचे कार्यालयाकडून तांत्रिक तपासणी करुन व त्यावर प्रशमन शुल्क, कामगार उपकर व विकास शुल्काची आकारणी करुन नियोमोचित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

मुंबई महानगरविकास प्राधिकरणाने अधिसूचित क्षेत्रातील बांधकामांवर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदींनुसार कार्यवाही करण्यास सुरुवात केली असून, सदर क्षेत्रातील एकूण गोदामांच्या बांधकाम प्रकरणी उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार एकूण ४४३ प्रकरणात नोटीस कार्यवाही करण्यात आली असून, त्यापैकी ९२ प्रकरणात गोदामांची बांधकामे निष्कासित करण्यात आली आहेत. तसेच एकूण ९३ प्रकरणात मा.न्यायालयात दावे दाखल असून त्यात मा.न्यायालयाने तात्पुरते स्थगिती आदेश पारित केले आहेत. उर्वरित प्रकरणी निष्कासनाची कार्यवाही करण्यात येत आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्रमांक १३९/२०१३ मधील मा.उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये भिवंडी परिसर अधिसूचित क्षेत्रातील करण्यात आलेल्या सर्व्हेक्षणात एकूण १३३४ गोदामांच्या बांधकाम प्रकरणी महारष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे तरतुदीनुसार नोटीस देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य शासनाच्या नवीन वाळू धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी होणेबाबत

**(६) * १९९२० श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.रमेश कराड, श्रीमती उमा खापरे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने दिनांक १ मे, २०२३ रोजीपासून नवीन वाळू धोरणानुसार रुपये ६०० प्रती ब्रास या दराने वाळू विक्री सुरु केली असून, वाळूच्या साठ्याअभावी नागरिकांना वाळू उपलब्ध होत नसल्याने वाळूची वाढती मागणी लक्षात घेऊन महसूल प्रशासनाने विविध नदीपात्रांमधून वाळू एकत्र आणण्याचे काम सुरू केले असल्याची बाब दिनांक ७ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सरकारच्या नवीन धोरणानुसार नदीपात्रातील वाळूचे उत्खनन, वाळू डेपोची निर्मिती, डेपोपर्यंत वाहतूक आणि व्यवस्थापन यासाठी राज्य सरकारकडून काढण्यात आलेली निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे काय, तद्नुषंगाने राज्यात सद्य:स्थितीत किती वाळू डेपोंची निर्मिती झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यात नद्या बारमाही वाहत असल्याने वाळू उपसा करणे शक्य नसल्यामुळे एक ब्रास वाळूसाठी अजूनही पाच ते सहा हजार रुपये मोजावे लागत असल्याने सर्वसामान्यांना घरे बांधणे अशक्य झाल्याचे तसेच विदर्भात विशेषतः नागपूर जिल्ह्यात ऑनलाईन पध्दतीने वाळू खरेदी प्रक्रिया प्रलंबित असल्याने नागरिकांना अद्याप ६०० रूपये दराने वाळू उपलब्ध होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात वाळू धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करून वाळूचा सुरळीत पुरवठा करण्याबाबत तसेच कोल्हापूर जिल्ह्यासाठी वेगळे वाळू धोरण निश्चित करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच आतापर्यंत किती जिल्ह्यात वाळू उपलब्ध करून देण्यात आली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) राज्यातील नागरिकांना बांधकाम योग्य वाळू स्वस्त दराने उपलब्ध करुन देणे तसेच अनधिकृत उत्खननास आळा घालण्याच्या उद्देशाने शासनामार्फत वाळू/रेतीचे उत्खनन, साठवणूक व विक्री व्यवस्थापन प्रायोगिक तत्वावर १ वर्षासाठी दिनांक १९/०४/२०२३ च्या शासन निर्णयान्वये सुधारित वाळू धोरण निर्गमित केले आहे.

सुधारित वाळू धोरणानुसार दिनांक १० जून ते ३० सप्टेंबर या पावसाळ्याच्या कालावधीत वाळू उत्खनन करण्यास बंदी आहे. त्यामुळे नदीपात्रातून वाळू उत्खनन करुन जास्तीत जास्त डेपो निर्मिती व्हावी या उद्देशाने निविदा प्रक्रिया राबविण्याचा कालावधी १५ दिवसावरुन ७ दिवस करण्यात आला. त्यानुसार दिनांक ३०/०६/२०२३ पर्यंत राज्यात एकूण १५ जिल्ह्यात ५६ वाळू डेपोची निर्मिती करण्यात आली आहे. उर्वरित जिल्ह्यांमध्ये काढण्यात आलेल्या निविदेला/फेर निविदेला देखील प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे राज्यात सर्व ठिकाणी अपेक्षित वाळू साठा करणे शक्य झाले नाही.

(३) व (४) कोल्हापूर जिल्ह्यातील बारमाही नद्या व त्यावरील कोल्हापूर पध्दतीचे बंधारे यामुळे नदी पात्र कोरडे पडत नाही. मा.राष्ट्रीय हरीत न्यायाधिकरण, नवी दिल्ली यांच्या आदेशामुळे नदीपात्रातील पाण्याखालील वाळू/रेती उत्खननास तसेच, यांत्रिकी साधनांचा वापर करुन वाळू उपसा करण्यास प्रतिबंध केला आहे. तथापि, सुधारित धोरणातील तरतुदीनुसार नदीपात्रातील गाळ व गाळ मिश्रित वाळू काढण्याच्या अनुषंगाने निविदा प्रक्रियेचा अवलंब करुन डेपो निर्मिती करण्याची कार्यवाही करण्याच्या सूचना आहेत.

सद्य:स्थितीत नागपूर जिल्ह्यात ११ वाळू डेपो कार्यान्वित असून त्यातून १२,२३५ ब्रास वाळू/रेती नागरिकांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धुळे-नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेडून कर्जवाटप प्रकरणी प्राप्त अर्ज व तालुकानिहाय सभासद यांच्यात समतोल न राखल्याबाबत

**(७) * १९९०० श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक याचे कार्यक्षेत्र हे नंदुरबार व धुळे जिल्ह्यात विस्तारलेले असून प्रतिवर्षी बँक आराखडा व कर्ज वाटप इत्यादी तयार करीत असताना दोन्ही जिल्ह्यातील एकूण प्राप्त अर्ज तसेच तालुकानिहाय शेतकरी सभासद यांना गृहीत धरून कर्ज प्रकरणे निकाली काढणे अभिप्रेत असते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ३१६ कोटी रुपयांचे कर्ज वाटप करणाऱ्या धुळे नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांनी अक्कलकुवा व तळोदा ही दोन्ही तालुके मिळून ६ कोटी रुपयांची तरतूद असताना केवळ ६५ लाख रुपये कर्ज पुरवठा केला असल्याचे मा.लोकप्रतिनिधी यांना दिनांक ३० मे, २०२३ रोजी झालेल्या बँकेच्या बैठकीत बँक प्रशासनाने दिलेल्या माहितीतून समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी अक्कलकुवा व तळोदा या दोन्ही तालुक्यात सर्वाधिक सभासद संख्या असणाऱ्या आदिवासी शेतकऱ्यांनी तीव्र असंतोष व्यक्त केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) होय. हे खरे आहे.
(२) व (३) धुळे नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने नाबार्ड व डी.एल.सी.सी.ने दिलेल्या पीक कर्ज वाटप लक्षांकानुसार धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील एकूण ६१३ संस्थांच्या ३१,७०४ सभासदांना रुपये ३४१.१७ कोटी इतक्या रकमेचे पीक कर्जवाटप केले आहे. (लक्षांकाच्या १२१%)

माहे जून, २०२३ अखेर बँकेने नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा व तळोदा या तालुक्यातील एकूण ३५ संस्थांच्या ५७० सभासदांना रुपये ७.५५ कोटी इतक्या रकमेचे कर्जवाटप केले आहे. त्याचप्रमाणे कर्जवाटपाची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी माहे जून, २०२३ मध्ये बँकेने अक्कलकुवा तालुक्यात तीन दिवसीय पीक कर्ज वाटप मेळावा आयोजित केला होता.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मच्छीमार बांधवांना आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(८) * १९८९४ श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कमी होत चाललेले मासळी उत्पादन, मच्छीमारीसाठी लागणाऱ्या मूलभूत सोयीसुविधांची कमतरता व डिझेलच्या वाढत चाललेल्या किंमती, वाढते प्रदूषण व अद्ययावत यांत्रिकी बोटींचा अधिक वापर यामुळे पारंपारिक पध्दतीने मच्छीमारी करणाऱ्या स्थानिक मच्छीमारांचा व्यवसाय धोक्यात आला असल्याची बाब दिनांक ३० मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील मच्छीमार बांधवांना आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजना, NABARD, RKVY, FIDF, निलक्रांती योजनेंतर्गत मासळी उतरविणारी बंदरे यांचा विकास करण्यात येत आहे. राज्याच्या खाडीलगत असलेल्या औदयोगिक

कारखान्यांमधून सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यामुळे या खाडी क्षेत्रामध्ये प्रदूषण होत असल्याबाबत प्राप्त तक्रारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याकडे कार्यवाहीस्तव पाठविण्यात आलेले आहे.

राज्याच्या सागरी किनारपट्टीवर निर्माण झालेल्या चक्रीवादळामुळे मच्छीमारांच्या नुकसानीपोटी रुपये ६९.६७४८ कोटी इतके अर्थसहाय्य देण्यात आलेले आहे.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता डिझेल प्रतिपूर्तीसाठी अर्थसंकल्पित रुपये १००.०० कोटी इतका निधी शासनामार्फत वितरीत करण्यात आला असून सदरचा निधी मच्छिमारांच्या बॅंक खात्यावर DBT द्वारे जमा करण्यात आलेला आहे.

डिझेल तेलावरील मुल्यवर्धित कराची प्रतिपुर्तीसाठी सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता रुपये २३५.३० कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता मंजूर अर्थसंकल्पित निधी रुपये १००.०० कोटी वजा जाता रुपये १३५.३० कोटी निधी उपलब्ध करून देण्यासाठी पुरक मागणी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्ह्यातील वाळूघाटाच्या लिलावाची प्रक्रिया स्थगित असल्याबाबत

**(९) * १९०७० श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यात महाराष्ट्र शासनाच्या वाळूघाटांच्या नवीन धोरणाच्या अंमलबजावणीमुळे आणि पर्यावरण मंडळाची मंजूरी न मिळाल्यामुळे वाळूघाटाच्या लिलावाची प्रक्रिया रखडलेली असल्याचे माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाळू घाट बंद असल्यामुळे वाळू लिलावाचा महसूल शासनाच्या खनिकर्म विभागाला मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व कालावधीमध्ये दिवस-रात्र वाळूचा अवैध उपसा करणाऱ्या प्रकरणामध्ये वाळू तस्करांविरोधात फौजदारी गुन्हे दाखल करून किती रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैध वाळू तस्करांविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) राज्यातील नागरिकांना स्वस्त दराने वाळू/रेती उपलब्ध करुन देणे तसेच, अनधिकृत उत्खननास आळा घालण्याच्या उद्देशाने शासनामार्फत रेती उत्खनन, वाहतूक व विक्री व्यवस्थापन याबाबत शासनस्तरावर शासन निर्णय दिनांक १९/०४/२०२३ अन्वये सुधारित धोरण निर्गमित केले आहे. गोंदिया जिल्ह्यात सन २०२२-२३ करीता एकूण ३३ रेतीघाटांना पर्यावरण अनुमती प्राप्त झाली आहे. त्यापैकी २ रेती घाट राखीव ठेवले असून सर्वकष वाळू धोरण दिनांक १९/०४/२०२३ नुसार ९ वाळू डेपो (३१ रेती घाट) करीता निविदा घेण्यात आली. त्यापैकी ५ वाळू डेपो (१७ रेती घाट) करीता निविदा यशस्वी होऊन कार्यान्वित झाले आहेत.

गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीवर आळा घालण्याकरीता गोंदिया जिल्ह्यात जिल्हास्तरीय/तालुकास्तरीय भरारी पथके स्थापन करण्यात आलेली असून, सन २०२२-२३ मध्ये गोंदिया जिल्ह्यात एकूण १९४ अवैध उत्खनन व वाहतूक प्रकरणी रक्कम रुपये २२२.३४ लक्ष इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे. तसेच ०१ प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

-----------------

## रेणापूर (जि.लातूर) तालुक्यात लम्पी आजारावरील लस उपलब्ध करून देण्याबाबत

**(१०) * १९७३५ श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेणापूर (जि.लातूर) तालुक्यात लम्पी आजाराचा प्रादुर्भाव सुरू असतानाही तालुक्याच्या पशुधन विभागाकडे लसीकरणासाठी लस उपलब्ध नसल्याची बाब दिनांक १० मे २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लम्पी आजारामुळे रेणापूर तालुक्यात ६० पशु दगावले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रेणापूर तालुक्यासह व जिल्ह्यात लम्पी आजारावर लसीकरणासाठी लस उपलब्ध करून देण्याबाबत तसेच ज्या शेतकऱ्यांची लम्पी आजारामुळे जनावरे दगावली त्यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) रेणापूर तालुक्यात सन २०२२-२३ या वर्षात ऑक्टोबर, २०२२ अखेर ९९.४५ टक्के गोवंशीय पशुधनास लम्पी चर्मरोग प्रतिबंधक लसीकरण करण्यात आलेले आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांन्वये लम्पी चर्मरोग नियंत्रणात आणण्यासाठी दरवर्षी प्रतिबंधक लसीकरण करणे आवश्यक आहे. लसीकरण पूर्ण झाल्यामुळे रेणापूर तालुक्यामध्ये दिनांक १०/०५/२०२३ रोजी वा त्यासुमारास लस उपलब्ध नव्हती, ही वस्तुस्थिती आहे.

सन २०२३-२४ मध्ये रेणापूर तालुक्यात पहिल्या टप्प्यात एकूण ९,३०० लम्पी चर्मरोग प्रतिबंधक लसमात्रा दिनांक २६/०६/२०२३ रोजी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. तालुक्यामध्ये दिनांक १/०७/२०२३ पासून लसीकरण सुरू करण्यात आलेले आहे.

(२) व (३) रेणापूर तालुक्यात दिनांक ३१/०३/२०२३ अखेर एकूण ४१ पशुधनाचा लम्पी चर्मरोग प्रादुर्भावामुळे मृत्यू झालेला असून, त्यापैकी ३५ मृत पशुधनाच्या मालकांना अर्थसहाय्य अदा करण्यात आलेले आहे. उर्वरित ६ मृत पशुधनाच्या मालकांना तसेच, दिनांक ०१/०४/२०२३ नंतर रेणापूर तालुक्यात मृत्यू झालेल्या २५ पशुधनाच्या मालकांना अर्थसहाय्य देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

सन २०२२-२३ मध्ये लातूर जिल्ह्यात ९८.४४ टक्के पशुधनास लम्पी चर्मरोग प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यात आलेले आहे. सन २०२३-२४ मध्ये लातूर जिल्ह्यासाठी पहिल्या टप्प्यात एकूण १,०९,००० लसमात्रा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या असून यामध्ये रेणापूर तालुक्यासाठी पुरवठा केलेल्या ९,३०० लसमात्रांचा समावेश आहे.

सन २०२२-२३ मध्ये लातूर जिल्ह्यात दिनांक ३१/०३/२०२३ अखेर ४१४ पशुधनाचा मृत्यू झालेला असून, त्यापैकी ३६७ पशुधनाच्या मालकांना रुपये ७६.३४ लक्ष अर्थसहाय्य अदा करण्यात आलेले आहे. ३३ मृत पशुधनाच्या अर्थसहाय्याचे प्रस्ताव अपात्र असून, १४ मृत पशुधनाच्या प्रस्तावांना तसेच, सन २०२३-२४ मध्ये लातूर जिल्ह्यात मृत्यू पावलेल्या २१३ पशुधनाच्या मालकांना अर्थसहाय्य देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या नव्याने झालेल्या पुनर्रचनेमुळे होणाऱ्या गैरसोयीबाबत

**(११) * १९५०९ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या नव्याने झालेल्या पुनर्रचनेमुळे नागरिक व पर्यटकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होणार असल्याची बाब माहे मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातील चांदोली राष्ट्रीय उद्यान व कोयना अभयारण्याचा दोन विभागातील गावाच्या परिसरातील नागरिकांना व पर्यटकांना वारणावती येथील १ किलोमीटरसाठी १०० किलोमीटरचा तर उखळू परिसरातील नागरिकांना ५ किलोमीटरसाठी १२० किलोमीटरचा प्रवास करावा लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातील गावातील नागरिकांना व येथे येणाऱ्या पर्यटकांच्या सोयीबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.
सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातील कोयना वन्यजीव अभयारण्य व चांदोली राष्ट्रीय उद्यान या दोन विभागातील स्थानिक परिस्थिती विचारात घेवून प्रशासकीय दृष्टीने कामकाज सुलभ होण्याकरीता प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे दिनांक ०३/०५/२०२३ रोजीच्या आदेशान्वये वनपरिक्षेत्र, परीमंडळ व नियतक्षेत्राची पुनर्रचना करण्यात आली आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तलासरी (जि.पालघर) तालुक्यातील बंद झालेल्या खदानीच्या ठिकाणी सुरक्षिततेच्या उपाययोजना करण्याबाबत

**(१२) * १९००३ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तलासरी (जि.पालघर) तालुक्यातील बंद झालेल्या खदानीत साठलेल्या पाण्याच्या तलावात आंघोळ करण्यासाठी गेलेल्या एका आदिवासी बांधवाचा बुडून मृत्यू झाला असल्याची घटना दिनांक २८ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी पालघर जिल्ह्यातील बंद झालेल्या खदानीच्या ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) व (३) तलासरी तालुक्यातील मौजे करंजगाव येथील बंद खदानीमध्ये दिनांक २४/०४/२०२३ रोजी एका व्यक्तीचा बुडून मयत झाल्याचे निदर्शनास आले आहे.

तलासरी तालुक्यातील बंद असलेल्या खदान/जमीन मालकांना बंद खदानीच्या ठिकाणी सुरक्षीततेच्या दृष्टीने तारेचे कंपाऊंड करणेबाबत व धोका/इशारा वजा सूचना फलक लावण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांतर्गत उत्खननाची परवानगी घेत असलेल्या सर्व कंत्राटदारांना उत्खननाच्या ठिकाणी सुरक्षिततेच्यादृष्टीने उपाययोजना करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडून सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## राज्याचे मद्य विक्रीच्या महसूल करातून मिळणारे उत्पन्न वाढविणेबाबत

**(१३)** * **१९७०६ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याचे महसुली उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने उत्पादन शुल्क विभागाकडून निरनिराळे प्रयत्न करण्यात येत असून देशातील आसाम, दिल्लीसह इतर राज्यांनी विक्री होणारे मद्य क्युआर कोडच्या माध्यमातून इलेक्ट्रॉनिक सिस्टीम मध्ये प्रकल्प राबविल्यामुळे त्यांच्या उत्पन्नात भरघोस वाढ झाली असून बनावट मद्य विक्रीस आळा बसला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशाच प्रकारचा प्रकल्प महाराष्ट्रात लागू करून राज्यात विक्री होणारे मद्य क्युआर कोड च्या माध्यमातून इलेक्ट्रॉनिक सिस्टीम मध्ये आणून त्यावर राज्य शासनाने नियंत्रण ठेवून मद्य विक्रीतुन जास्तीत जास्त उत्पन्न मिळविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंभूराज देसाई :** (१) आसाम, दिल्ली या राज्यांमध्ये क्युआर कोड प्रणालीचा वापर होत आहे. तथापि, यामुळे या दोन राज्यात मद्यविक्रीतून प्राप्त महसूलामध्ये महाराष्ट्र राज्याच्या तुलनेत भरघोस वाढ झाल्याचे दिसून येत नाही.
(२) मद्य उत्पादकापासून ठोक विक्रेता ते किरकोळ विक्रेता या वितरण साखळीमध्ये मद्याच्या वितरणाचा तपशील संकलन व नियंत्रण याकरीता पुरवठा साखळी व्यवस्थापन प्रणाली (SCM) विकसीत करुन घेतली आहे, तसेच त्यामध्ये वेळोवेळी नवनवीन प्रणाली, तंत्रज्ञान समाविष्ट करण्यात येत आहे.

तसेच, शासनाकडून उत्पादन शुल्कापासून मिळणाऱ्या महसूलाची गळती थांबवून महसूल वाढीसंदर्भात उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने ट्रॅक ॲण्ड ट्रेस प्रणाली राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. याव्यतिरिक्त अवैध मद्यविक्री विरुध्द धडक कारवाई करुन महसूल उत्पन्न वाढीबाबत वेळोवेळी कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात फळपीक विम्याची साडेसात हजार बोगस प्रकरणे आढळून आल्याबाबत

**(१४) * १८९६३ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील फळपीक योजनेत कोटयवधी रुपयांचा गैरप्रकार झाल्याबाबत मा.कृषी आयुक्त यांनी चौकशी करुन कारवाई करण्याचे आदेश दिले असल्याचे दिनांक २१ मार्च,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक बोगस प्रकरणे तर जळगांव जिल्ह्यात ८० हजार बोगस प्रकरणे आढळून आले असून प्राप्त तक्रारीनुसार, शेतात कोणतेही फळपीक नसताना पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेत साडेसात हजार बोगस प्रकरणे चौकशीमध्ये आढळून आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बोगस प्रकरणांची स्थानिक घटकांना चौकशी करण्यास विरोध केल्यामुळे ८० हजार प्रकरणांची चौकशी करण्यात आली नसल्याचे तसेच शेतकऱ्यांना फसवून खोटया माहितीच्या आधारे त्यांचा परस्पर विमा उतरविण्यात आल्याचे आढळून आले असून त्यामध्ये ४० कोटी बोगस विमा प्रकरणे असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जळगाव, सोलापूर जिल्ह्यांसह आढळून आलेल्या बोगस प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सोलापूर जिल्ह्यात एकूण ४४१३ विमा अर्जदारांपैकी २७१३ बोगस विमा प्रकरणे तर जळगाव जिल्ह्यात एकूण ७८४३० विमा अर्जदारांपैकी १९९७२ अर्जांची तपासणी झाली असून ११४५ बोगस विमा प्रकरणे आढळून आली आहेत.

दिनांक २६ जून २०२३ अखेर राज्यात एकूण २,४८,९३० विमा अर्जांपैकी १,९०,४७२ विमा अर्जांची तपासणी पूर्ण झाली असून त्यापैकी १४,७९८ बोगस प्रकरणे आढळून आली आहेत.

(३) होय, हे खरे आहे.

क्षेत्रिय तपासणी अंती १४७९८ बोगस विमा प्रकरणे आढळून आली असून त्यामधील केंद्र व राज्य हिस्सा अनुदानाची रक्कम रुपये ५३.२७ कोटी इतकी होते.

(४) शासन निर्णय दिनांक १८ जून, २०२१ मधील बाब क्र.९ नुसार बोगस विमा प्रकरणात संबंधित दोषींवर कायदेशीर कार्यवाही करण्याची जबाबदारी जिल्हा संनियंत्रण समितीच्या मार्गदर्शनानुसार संबंधित विमा कंपनीची राहिल. त्यानुसार तपासणी पूर्ण झालेल्या जिल्ह्यातील संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना शासन निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश कृषी आयुक्तालय स्तरावरुन देण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या महात्मा ज्योतिराव फुले कर्ज मुक्ती योजनेतील प्रोत्साहनपर अनुदानापासून दोन लाख शेतकरी वंचित असल्याबाबत

**(१५) * १८८०७ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.सत्यजीत तांबे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शेतकऱ्यांच्या हितासाठी "महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती" योजना २०१९ अंतर्गत सन २०१७–२०१८, २०१८–२०१९ व २०१९–२०२० या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षांमध्ये पीक कर्जाची उचल करुन शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या विहित कालावधीत नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना रुपये ५० हजार प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दोन लाख शेतकऱ्यांच्या तब्बल ७४० कोटी रुपयांच्या वितरणाला अद्यापी विभागाने मान्यता दिली नसल्याने अजूनही प्रोत्साहन अनुदान प्रलंबित असल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त योजनेंतर्गत प्रोत्साहनपर लाभ देण्याच्या नियम व अटी जाचक असल्याने त्याचा लाभ शेतकऱ्यांना पूर्णपणे मिळत नसून विशेषत: सोलापूर जिल्ह्यात ७१,२१८ ऑनलाईन करण्यात आलेल्या कर्जखात्यांपैकी ३५,५०३ शेतकऱ्यांना अनुदान देण्यात आले व ३५७१५ कर्जखाती अनुदानापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०१९ अंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजनेच्या नियम व अटी शिथील करुन योजनेतील नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या लाभार्थ्यांना तसेच लाभार्थ्यांच्या वारसांना रुपये ५० हजार देण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) होय. हे खरे आहे
(२) व (३) नाही. हे खरे नाही.
(४) सदर योजनेच्या निकषानूसार प्राथमिकदृष्ट्या पात्र ठरलेल्या राज्यातील एकूण १५.४४ लाख कर्जखात्यांना विशिष्ट क्रमांक देण्यात आला आहे. त्यापैकी १५.०६ लाख कर्ज खात्यांचे आधार प्रमाणीकरण झाले आहे. त्यापैकी एकूण १४.१४ लाख कर्जखात्यांना रुपये ५१३२ कोटी रकमेचा लाभ प्रत्यक्ष वितरीत करण्यात आला आहे.

सदर योजनेच्या निकषानूसार प्राथमिकदृष्ट्या पात्र ठरलेल्या सोलापूर जिल्ह्यातील एकूण ४०,०४६ खात्यांना विशिष्ट क्रमांक देण्यात आला असून त्यापैकी ३९,०३२ कर्जदारांनी आधार प्रमाणिकरण केले आहे. त्यापैकी ३७,०१७ कर्जखात्यांना रुपये १६६.०२ कोटी रकमेचा लाभ देण्यात आला आहे. तसेच सदर योजनेंतर्गत पात्र ठरलेल्या उर्वरीत कर्जदारांना लाभ देण्यासाठीची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात महसूल विभागातील विविध संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१६) * १८८३७ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अरुण लाड, श्री.महादेव जानकर, श्री.प्रविण पोटे-पाटील, श्री.गोपिचंद पडळकर, ॲड.अनिल परब, श्री.जयंत पाटील, श्री.एकनाथराव खडसे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.रामदास आंबटकर, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महसूल विभागात विविध संवर्गातील वर्ग-१ ते वर्ग-४ च्या रिक्त असलेल्या एकूण १३००० पदांमध्ये तलाठ्यांच्या ५०३० पदाचा समावेश असून, सदरहू पदे ही पदोन्नती व सरळसेवेने भरावयाची असल्याने दिनांक ३१ डिसेंबर, २०२० अखेरपर्यंतचा तलाठ्यांच्या रिक्त पदाचा सामाजिक व समांतर आरक्षणनिहाय तपशील महसूल विभागाने दिनांक ३० मार्च, २०२२ रोजी शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मोठ्या प्रमाणावरील रिक्त पदामुळे एका तलाठ्याकडे ४ ते ५ गावांचा कार्यभार असल्याने त्याच्यावर कामाचा अतिरिक्त ताण येऊन शेतकऱ्यांच्या नैसगिक आपत्तीसंदर्भातील तसेच अन्य कामांना विलंब होत असून सर्वसामान्यांना महसूल कार्यालयात कामासाठी वारंवार फेऱ्या माराव्या लागत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अमरावती, वरुड व इतर तालूक्यात (जि.अमरावती) तलाठी, कोतवालसह अन्य कार्यालयीन पदे रिक्त असल्यामुळे फेरफार, पी.आर. कार्ड ची प्रकरणे प्रलंबित आहेत तसेच मुक्ताईनगर, बोदवड, रावेर (जि.जळगाव) येथील महसूल विभागात तहसिलदार, नायब तहसिलदार, मंडळ अधिकारी, तलाठी, महसूल सहाय्यक अशी अनेक पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने दिनांक २९ नोव्हेंबर, २०२२ रोजी परिपत्रक निर्गमित करुन तलाठी संवर्गातील ४१२२ पदांची भरती करण्याचे आदेश निर्गमित करूनही अद्याप भरतीसंदर्भात जाहिरात न काढण्यामागील तसेच सदर पदे रिक्त राहण्यामागील कारणे काय आहेत,
(५) असल्यास, कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, जळगाव आणि नागपूर अशा सर्व महसूल विभागातील तलाठ्यांसह अन्य संवर्गातील पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) दिनांक ३१/०५/२०२३ अखेर राज्यातील महसूल विभागात विविध संवर्गातील वर्ग-१ ते ४ ची एकूण १३३८१ पदे रिक्त असून त्यामध्ये तलाठ्यांच्या ५०३० पदांचा समावेश आहे हे खरे आहे. तलाठ्यांची पदे ही सरळसेवेने भरण्यात येत असून दिनांक ३१/१२/२०२२ अखेरपर्यंतचे तलाठ्यांच्या रिक्त पदाचा सामाजिक व समांतर आरक्षणनिहाय तपशील सर्व जिल्हयांकडून प्राप्त झाला आहे.

(२) सद्य:स्थितीत राज्यात तलाठी संवर्गातील १५७४४ पदे मंजूर असून यापैकी ५०३० पदे रिक्त आहेत. सदर रिक्त सजांचा अतिरीक्त कार्यभार नजिकच्या तलाठ्यास सोपविण्यात आला असून नैसर्गिक आपत्ती तसेच सर्व सामान्य नागरीकांची कामे प्रलंबित राहणार नाही, याची दक्षता घेण्यात येत आहे.
(३) होय हे खरे आहे.
(४) व (५) राज्यातील तलाठी गट-क संवर्गातील एकूण ४६४४ पदे भरण्याकरीता दिनांक २६/०६/२०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून परीक्षेकरीता ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा कालावधी दिनांक २६/०६/२०२३ ते दिनांक १७/०७/२०२३ असा आहे.

महसूल सहायक यांची ६४६ पदे भरण्याकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दिनांक २०/०१/२०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करुन दिनांक ३०/०४/२०२३ रोजी परीक्षा झाली आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील वर्ग-१ व २ संवर्गातील सरळसेवेने पदभरती करीता मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सादर करण्यात आलेले आहे. तसेच पदोन्नतीने पदभरती करण्याकरीता दिनांक २७/०१/२०२३ रोजीच्या परिपत्रकान्वये कालबध्द कार्यक्रम आखून कार्यवाही करण्याबाबतच्या सविस्तर सूचना देण्यात आल्या आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्याचे एकत्रीकरण करण्याबाबतच्या अधिनियमाची अधिसूचना अंतिम करण्याबाबत

**(१७) * १९४३७ श्री.शशिकांत शिंदे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्याचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ चे कलम ४(१) अन्वये किमान क्षेत्र घोषित करण्याबाबतची अधिसूचना दिनांक ५ मे, २०२२ रोजी प्रसिध्द होऊन व आक्षेपाकरीताचा ३ महिन्याचा कालावधी दिनांक ४ ऑगस्ट, २०२२ रोजी उलटून गेल्यानंतरही अधिसूचना अंतिम झाली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील अकोला व रायगड जिल्हा वगळून उर्वरित जिल्ह्यांकरीता जिरायत जमिनीकरीता २० गुंठे व बागायत जमिनीकरीता १० गुंठे इतके प्रमाणभूत क्षेत्र दिनांक ५ मे, २०२३ रोजीच्या प्रारुप अधिसूचनेन्वये शासनाने घोषित केले आहे, यासंदर्भात प्राप्त सूचना व आक्षेप विचारात घेवून त्यानुषंगाने सदरची अधिसूचना अंतिम करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त अधिसूचना अंतिम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

सदर प्रकरणी दिनांक ५ मे, २०२२ रोजीच्या प्रारूप अधिसूचनेबाबत प्राप्त सूचना व आक्षेप विचारात घेवून आवश्यक त्या बदलांसह सदरची अधिसूचना अंतिम करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्ह्यात रोजगार हमी योजनांच्या कामामध्ये कोट्यवधींचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१८) * १९३७५ श्री.अंबादास दानवे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) फुलंब्री व सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यांतील ७३ रस्त्यांची बनावट देयके तयार करुन शासकीय कोषागारातुन १० कोटी ७ लक्ष रुपयांचा अपहार केल्याबाबतची घटना माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औरंगाबाद जिल्ह्यातील फुलंब्री तालुक्यात सन २००९ ते २०१६ या कालावधीत विविध गावांमध्ये कुशल रोजगार हमी योजनेंतर्गत एकूण ४२ रस्त्यांकरीता ५ कोटी ५० लक्ष ४६ हजार रुपयांची आणि सिल्लोड तालुक्यात ३१ रस्त्यांकरीता ४ कोटी ५६ लक्ष ५४ हजार रुपयांची कामे न करता बनावट देयके तयार करण्यात आली आहेत, तसेच उस्मानाबाद पंचायत समितींतर्गत रोजगार हमी योजनेच्या कामाचे सुमारे रुपये ६३ लाख मजुरांच्या खात्यावर जमा न करता दुसऱ्याच व्यक्तींच्या खात्यावर जमा केले असून १७ कामांच्या मुल्यांकनापेक्षा रुपये १९ लाख इतकी रक्कम जास्त दाखवून अपहार केला असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच अश्या प्रकरणांना आळा घालण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे नाही.

सदर प्रकरणाचा पोलीस तपास चालू आहे व ही कामे बनावट असल्याचे आजपर्यंत सिध्द झालेले नाही.
(२) हे खरे नाही.

अद्याप पोलीस यंत्रणेकडून तपास सुरु आहे.
(३) पोलिसांमार्फत चौकशी सूरू आहे. चौकशीत सिध्द झाल्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात शेतकऱ्यांना तृणधान्ये प्रक्रिया उद्योगासाठी प्रशिक्षण आणि सुधारित यंत्रसामुग्री देण्याबाबत

**(१९) * १९६४९ प्रा.राम शिंदे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारत सरकारने संयुक्त राष्ट्र संघात २०२३ हे वर्षे आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष म्हणून जाहीर केल्यामुळे राज्यात तृणधान्ये व प्रक्रिया उद्योग मोठ्या प्रमाणात निर्माण होणार असल्याची बाब माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामीण भागातील उद्योजकांना तृणधान्य उद्योगासाठी प्रशिक्षण आणि सुधारित यंत्रसामग्री देण्यासाठी शासनाने कोणती योजना तयार केली आहे काय,
(३) असल्यास, शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी विविध तृणधान्यांपासून बनविण्यात येणारे पदार्थ आणि त्याचे मार्केटिंग करण्यासाठी व उद्योजकांना पुरेसे अर्थसहाय्य आणि उत्पादक शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (PMFME) या योजनेंतर्गत राज्यस्तरीय तांत्रिक संस्था (SLTI) मार्फत तसेच वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर या संस्थेमार्फत प्रशिक्षण देण्यात येत आहे. तसेच स्मार्ट प्रकल्पांतर्गत पौष्टिक तृणधान्य मूल्यसाखळी विकासाचे ३८ उप प्रकल्प शेतकऱ्यांच्या समुदाय आधारित संस्थांना मंजूर केले आहेत.
(३) केंद्र शासन सहाय्यित प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (PMFME) या योजनेंतर्गत (अ) वैयक्तिक/गट प्रकल्प-पात्र प्रकल्प खर्चाच्या ३५% व जास्तीत जास्त १० लाख अनुदान, (ब) सामायिक पायाभूत सुविधा-पात्र प्रकल्प खर्चाच्या ३५ % व जास्तीत जास्त ३ कोटी, (क) मार्केटिंग व ब्रॅन्डींग-पात्र प्रकल्प खर्चाच्या ५०% प्रकल्पनिहाय अनुदान देण्यात येते. (ड) प्रशिक्षण- योजनेंतर्गत जिल्हास्तरीय समितीने निवड केलेल्या लाभार्थ्यांना विनामुल्य प्रशिक्षण दिले जाते, (ई) वनामती व रामेती स्तरावर राष्ट्रीय कृषी विकास योजना व आत्मा योजनेतून विविध प्रशिक्षण घेण्यात आली आहेत व चालू वर्षीही घेण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईच्या सागरी किनारा मार्ग प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या मच्छीमारांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(२०) * १९७७३ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईच्या सागरी किनारा मार्ग प्रकल्पाचा परिणाम लहान मच्छीमारांवर होत असल्याचे टाटा समाज विज्ञान संस्थेने (टी.आय.एस.एस) केलेल्या सर्वेक्षणातून निदर्शनास आले असल्याने पारंपारिक पध्दतीने मासेमारी करणारा वर्ग आर्थिक संकटात सापडल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई येथील प्रकल्प बाधित मच्छीमारांची नुकसान भरपाई देण्यासाठी महानगरपालिका आणि शासनाने धोरण तयार केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या धोरणात प्रकल्प बाधित मच्छीमारांना कायमस्वरूपी उपजीविका, शैक्षणिक, आर्थिक मदत इ. देण्याच्यादृष्टीने कोणत्या योजना तयार केल्या वा करण्यात येत आहेत तसेच या धोरणात प्रकल्पबाधित मच्छीमारांना टाटा समाज विज्ञान संस्थेच्या अहवालानुसार देण्यात येणाऱ्या मदतीची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

सागरी किनारा मार्ग प्रकल्प हा बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्यामार्फत राबविण्यात येत आहे. सदर प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्याची कार्यवाही त्यांच्यामार्फत करण्यात येत असून मत्स्यव्यवसाय विभाग आवश्यक ते सहकार्य करीत आहे.

तसेच विविध बांधकाम प्रकल्पामूळे बाधित होणाऱ्या मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्याच्या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक ०९/०३/२०२३ अन्वये राज्यव्यापी नुकसान भरपाई धोरण तयार करण्यात आलेले आहे.

(३) सागरी किनारा मार्ग प्रकल्पामुळे बाधित होत असलेल्या १३४३ मच्छिमारांची यादी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत या कार्यालयास प्राप्त झालेली असून सदरची यादी या कार्यालयामार्फत सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई शहर कार्यालयास तपासणीकरीता पाठविण्यात आलेली आहे. सदर यादीतील लाभार्थ्यांची पडताळणी विहित कार्यपध्दतीनुसार करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागड लोहखाणीमुळे अपघाताच्या संख्येत वाढ झाल्याबाबत

**(२१) * १९४२१ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागड येथील खाणीतून लोह खनिजाच्या दिवस-रात्र सुरू असलेल्या वाहतूकीमुळे, वाहनांमुळे तसेच सुरजागड-आष्टी-चंद्रपूर मार्गावर मागील काही दिवसांपासून अपघातांच्या वाढत्या घटनांमुळे मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने जिल्हाधिकारी, गडचिरोली यांना नोटीस बजावली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गडचिरोली येथील अपघातांच्या वाढत्या घटना रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये सुरू असलेल्या विविध राष्ट्रीय महामार्गाच्या कामांसदर्भात जनहित याचिका क्र.२०/२०२३ मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे दाखल करण्यात आली असून त्यानुषंगाने मा.न्यायालयाने नोटीस बजावली आहे.

(२) गडचिरोली येथील अपघातांच्या वाढत्या घटना रोखण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

- ठराविक अंतरावर चेक पोस्ट तयार करण्यात आले असून वाहनांची नियमितपणे तपासणी करण्यात येते.
- वाहतूकीच्या मार्गावर दिशादर्शक फलक, वेगमर्यादेचे फलक, स्पीड ब्रेकर बसविण्यात आले आहेत.
- पोलीस विभागातर्फे नाकाबंदी करून वाहनांची तपासणी करण्यात येते.
- अपघात झाल्यास मदतीकरीता रुग्णवाहिका तैनात करण्यात आली आहे.
- त्रिवेणी अर्थमुव्हर्स प्रा.लि. कंपनीमार्फत लोहखनिज वाहतूकीच्या मार्गावर सुरक्षा गार्ड तैनात करण्यात आले आहेत.
- परिवहन विभागामार्फत गडचिरोली जिल्ह्यातील अपघात कमी करण्यासाठी एकात्मिक वाहतूक व्यवस्थापन प्रणाली बसविण्याच्या सूचना परिवहन आयुक्त यांनी दिलेल्या आहेत.
- सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत गडचिरोली जिल्ह्यामध्ये विविध ठिकाणी रस्ता नुतनीकरणाची, उन्नतीकरणाची व मजबुतीकरणाची तसेच काही कामांची निविदा प्रक्रियेची कामे सुरू आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ग्रामीण भागातील दुध उत्पादनास चालना देण्याकरीता सुरु करण्यात येणाऱ्या दुधाळ जनावरांच्या योजनेबाबत

**(२२) * १९७१७ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील दूध उत्पादनास चालना देण्याकरीता महाराष्ट्र शासनाच्या कृषी व पशुसंवर्धन विभागामार्फत शासन निर्णय क्र. जिवायो-२०२३/ प्र.क्र.२१/पदुम-४, दिनांकित २७ एप्रिल, २०२३ नुसार दुधाळ जनावरांची योजना सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेच्या लाभार्थी निवडीकरीता तीन निकष ठेवले असून यामध्ये महिला बचत गटातील लाभार्थी, अल्पभूधारक शेतकरी (१ ते २ हेक्टरपर्यंतचे भूधारक) तसेच सुशिक्षित बेरोजगार यांची नोंद शासनाच्या विभागाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे,

(३) असल्यास, मात्र लाभार्थी निवडीच्या निकषातून अत्यल्प भूधारक शेतकरी यांना वगळण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त योजनेच्या लाभार्थी निवडीच्या निकषामध्ये बदल करुन अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांचा देखील समावेश करण्यात यावा, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ एप्रिल, २०२३ रोजी मा.पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री यांना लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे, सदरील कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांच्या निवडीसाठी दारिद्रय रेषेखालील लाभार्थी, अत्यल्प भूधारक शेतकरी, अल्प भूधारक शेतकरी, सुशिक्षीत बेरोजगार (रोजगार व स्वयंरोजगार केंद्रात नोंद असलेले) व महिला बचत गटातील लाभार्थी हे ०५ निकष निश्चित करण्यात आलेले असून, त्यांची नोंद पशुसंवर्धन विभागाकडे करण्यात येत नाही.
(४), (५) व (६) लाभार्थी निवडीच्या निकषात "अत्यल्प भूधारक शेतकरी" यांचा समावेश असल्याने, त्यांचा नव्याने समावेश करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यात भेसळयुक्त कृषी औषधांची विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(२३)** * **१८८४९ श्री.अरुण लाड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यात भेसळयुक्त कृषी औषधांची सर्रास विक्री होत असून बोगस कृषी औषध विक्रेत्यांकडून द्राक्ष उत्पादक, भाजीपाला उत्पादक तसेच सामान्य शेतकऱ्यांची लाखो रुपयांची फसवणूक होत असल्याची बाब दिनांक ४ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृषी विभागाच्या गुणनियंत्रण विभागाकडे शेतकऱ्यांनी वारंवार मागणी करुनही बनावट औषध विक्री करुन फसवणूक करणाऱ्यांविरुध्द कोणतीही कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले, तसेच चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या बोगस कृषी औषधे विक्रेत्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) सांगली जिल्ह्यामध्ये सन २०२२-२३ मध्ये अप्रमाणित आढळून आलेल्या नमून्यांच्या अनुषंगाने, बियाणे-९५, खते-३८ व किटकनाशकांच्या बाबतीत ५ अशा कोर्टकेस दाखल करण्यात आल्या आहेत. उर्वरीत साठा विक्रीबंद आदेश देऊन जप्तीची कारवाई करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत रुपये ३१.३४

लाख किंमतीचा १३४.३२ मे.टन खते, १०५.७५ मे.टन बियाणे व रुपये १४.५० लाख किंमतीचा किटकनाशके साठा जप्त करण्यात आलेला आहे. तसेच, बियाणे ११२, खते १८९ व किटकनाशके यांचे ४२ परवाने निलंबित आणि बियाणे-८८, खते-११४ व किटकनाशके-१७ एवढे परवाने रद्द करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई परिसरात खारफुटींची कत्तल व पाणथळ जागांवर भराव टाकण्यात येत असल्याबाबत

**(२४) * १९०२६ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई परिसरात खारफुटीच्या सर्रासपणे होत असलेल्या कत्तलीसंदर्भात तसेच उरण, नवी मुंबई व उलवे नोड परिसरात अनेक ठिकाणी खारफुटी, पाणथळ जागांवर डेब्रीजचा कचरा टाकून भराव करण्यात येत असल्याबाबत बी.एन.कुमार, संचालक नॅट कनेक्ट फाऊंडेशन यांनी मागील दीड वर्षांपासून सातत्याने मा.महसूल मंत्री, जिल्हाधिकारी रायगड, मा.सचिव, पर्यावरण विभाग आदीकडे तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी सदरहू गुन्हेगारांविरोधात संबंधितांनी कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे बी.एन.कुमार, संचालक नॅट कनेक्ट फाऊंडेशन यांनी माहे मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री महोदयांकडे निवेदन सादर करून कारवाई करण्याची मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांनी पर्यावरण विभाग, महसूल विभाग आणि नगरविकास विभागाचे अप्पर मुख्य सचिव यांचे समवेत बैठक घेवून बी.एन.कुमार, संचालक नॅट कनेक्ट फाऊडेशन यांनी केलेल्या तक्रारीबाबत कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर तक्रारीच्या व बैठकीच्या अनुषंगाने खारफुटींच्या कत्तलीबाबत तसेच जासई, भेंडखळ आणि सावरखार या तीन पाणथळ क्षेत्राच्या भरावाच्या विरूध्द आलेल्या तक्रारीसंदर्भात दिलेल्या आदेशानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) प्रश्नाधीन विषयाबाबतचे मा.मुख्यमंत्री कार्यालयाकडून निवेदन पर्यावरण व वातावरणीय बदल विभागास प्राप्त झाले आहे.
(४) प्रश्नाधीन विषयाबाबत जिल्हाधिकारी रायगड यांचेकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय व वन विभागामार्फत करण्यात आलेल्या स्थळपाहणी मध्ये प्रश्नाधीन नमूद ठिकाणी कांदळवन वनस्पतीचा ऱ्हास झाल्याचे आढळून आले नाही.

मा.उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार कांदळवन व पाणथळ क्षेत्राचे संरक्षण व संवर्धन प्रभावीपणे होण्यासाठी तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय समिती गठीत केलेली असून समितीमार्फत तक्रारींच्या अनुषंगाने स्थळपाहणी करण्याचे निर्देश देऊन तक्रारीत तथ्य असल्यास संबंधितांविरुध्द गुन्हे दाखल करून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मेळघाटातील वन्य प्राण्यांची पाण्याकरीता भटकंती होत असल्याबाबत

**(२५) * १९३२५ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पर्यावरणाच्या असंतुलनामुळे मेळघाटातील बारमाही वाहणाऱ्या तापी, सिपना, गडगा, खंडू, खापरा व डवाल या नद्यांचे पात्र कोरडे झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जंगलातील वन्य प्राणी आणि गावातील पाळीव प्राणी यांना पाण्याकरीता भटकंती करावी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मेळघाट हे नैसर्गिक साधनसंपत्तीने परिपूर्ण असलेले क्षेत्र असून येथे मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असल्याने तसेच तेथील साठवण बंधाऱ्याचे योग्य नियोजन व देखभाली अभावी होत असलेली दुरवस्था यांसह तेथे आवश्यक जलसंधारणाची कामे पूर्ण न झाल्यामुळे सदर परिस्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर भागात वृक्ष लागवड, पाण्याचे संवर्धन, जलसंधारण आदी कामांबाबत उपाययोजना करून या नद्यांना बारमाही पाणी उपलब्ध करून देणेबाबत तसेच निधी अभावी प्रलंबित असलेले कामे पूर्ण करणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील वन्यजीव विभागामधील क्षेत्रातून वाहणाऱ्या तापी, सिपना, गडंगा, खंडु, खापरा व डवाल नद्यांची पात्रे दरवर्षी उन्हाळयाच्या शेवटी कोरडे होतात. तथापि, सदर नद्यांच्या पात्रातील डोहात बऱ्याच ठिकाणी पावसाळयाच्या सुरुवातीपर्यंत पाणी साचलेले दिसून येते.

(२) व (३) हे खरे नाही.

वन्यप्राण्यांना विशेषत: उन्हाळयात वनक्षेत्रात पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरीता मेळघाट वन्यजीव विभागामार्फत उपाययोजना करण्यात येतात.

- वनक्षेत्रात ठिकठिकाणी कृत्रीम पाणवठे तयार करण्यात आले असून त्यामध्ये बोअर वेल, सोलर पंपद्वारे तसेच टॅन्करद्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो.
- व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील वनतळी, जलशोषकचर, सलग समतलचर, समपातळी बांध, पाणवठ्यातील गाळ काढून जल व मृद संधारणाची कामे करण्यात येतात.
- डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना अंतर्गत पाणवठे तयार करुन गावातील पाळीव प्राण्याकरीता पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात येते.

मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती अंतर्गत सन २०२० मध्ये ४०११, सन २०२१ मध्ये २०२१ व जानेवारी, २०२२ ते एप्रिल, २०२३ पर्यंत २०९६ इतक्या वृक्षांची तोड झाल्याचे निदर्शनास आले आहे. अशा गुन्हे नोंदवून माल जप्त करण्याची कार्यवाही करण्यात येते.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील गावांमध्ये संयुक्त वनव्यवस्थापन समित्या स्थापन करण्यात आल्या असून त्यांच्या माध्यमातून वनसंरक्षण व संर्वधनास स्थानिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## स्वर्गीय विठाबाई नारायणगांवकर आर्थिक विकास महामंडळ स्थापन करणेबाबत

**(२६) * १९५५१ श्री.सचिन अहिर, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महाराष्ट्राची लोककला, लोकसंस्कृती असलेल्या तमाशा लोककलावंतांना वृध्दापकाळात, सन्मानाचे जीवन जगता यावे, त्यांच्या निवास, भोजन, औषधोपचाराची सोय त्याचबरोबर त्यांचेसाठी वृद्धाश्रम, अल्पव्याजाने कर्ज तसेच शासकीय योजनांचा लाभ मिळावा यासाठी स्वर्गीय विठाबाई नारायणगांवकर आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी मागणी मा.लोकप्रतिनिधींनी शासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने राज्यात अन्य सात महामंडळांची स्थापना केलेली असून, तमाशा कलावंतांसाठी स्वर्गीय विठाबाई नारायणगांवकर आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याबाबतची मागणी मा.विरोधी पक्षनेते (विधानसभा) यांनी, माहे एप्रिल, २०२३ मध्ये मा.मुख्यमंत्री आणि मा.उप मुख्यमंत्री यांचेकडे पत्र/निवेदने देऊन केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) होय हे खरे आहे.
(३) राज्यातील वृध्द कलावंत व साहित्यिक यांच्यासाठी "राजर्षी शाहू वृध्द साहित्यिक व कलावंत मानधन" योजना कार्यन्वित आहे. या योजनेतून दरमहा पात्र कलावंत व साहित्यिक यांना त्यांच्या उपजिविकेसाठी मानधन दिले जाते. एकल कलाकार व समूह संस्थांना कोविड दिलासा पॅकेजद्वारे अर्थसहाय्य करण्यात आलेले आहेत.

तसेच, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने "महाराष्ट्र राज्य असंघटित कामगार कल्याण महामंडळ" ची स्थापना केली असून दिनांक ६ जुलै, २०२३ च्या शासन निर्णयान्वये असंघटित कामगार या आर्थिकदृष्ट्या निम्नस्तरातील घटकास सामाजिक सुरक्षा व विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळण्यासाठी महाराष्ट्र राज्य असंघटित कामगार कल्याण महामंडळ व त्याचे अंतर्गत क्षेत्रनिहाय ३९ आभासी मंडळे स्थापन करण्यास दिनांक ६ जुलै, २०२३ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयामध्ये सर्व लोककलावंत तसेच तंत्रज्ञ यांचाही समावेश करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील मच्छीमारांना शासनाकडून देय असलेला थकीत डिझेल परतावा मिळणेबाबत

**(२७) * १९६८२ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील ४९ मच्छीमार संस्थांचा २४ कोटी ३१ लाख ५८ हजार २२२ रुपयांचा डिझेल परतावा शासनाकडे थकीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मच्छीमारांना डिझेल परताव्याची रक्कम वेळेवर मिळत नसल्याने तसेच किनाऱ्यावर येणारी चक्रीवादळे, रासायनिक कंपन्यामुळे होणारे प्रदूषण, घटणारे मत्स्योत्पादन इ. कारणांमुळे अनेक मच्छीमार कर्जबाजारी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडे परताव्यासाठी मागण्यात येणारा निधी आणि जिल्ह्याला प्रत्यक्षात प्राप्त होणारा निधी यात तफावत असल्यामुळे परताव्याचा निधी वितरणास अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रायगड जिल्ह्यातील मच्छीमारांना वेळेवर डिझेल परतावा मिळण्यासाठी शासनाकडून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजना, NABARD, RKVY, FIDF, निलक्रांती योजनेंतर्गत मासळी उतरविणारी बंदरे यांचा विकास करण्यात येत आहे. राज्याच्या खाडीलगत असलेल्या औदयोगिक कारखान्यामधून सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यामुळे या खाडी क्षेत्रामध्ये प्रदूषण होत असल्याबाबत प्राप्त तक्रारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याकडे कार्यवाहीस्तव पाठविण्यात आलेले आहे.

राज्याच्या सागरी किनारपट्टीवर निर्माण झालेल्या क्यार, महा, निसर्ग, तौक्ते चक्री वादळामुळे मच्छीमारांच्या नुकसानीपोटी शासनाने रुपये ६९.६७४८ कोटी इतके अर्थसहाय्य दिलेले आहे.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता डिझेल प्रतिपूर्तीसाठी अर्थसंकल्पित रुपये १००.०० कोटी इतका निधी शासनामार्फत वितरित करण्यात आला असून सदरचा निधी मच्छिमारांच्या बँक खात्यावर DBT द्वारे जमा करण्यात आलेला आहे.

डिझेल तेलावरील मुल्यवर्धित कराची प्रतिपुर्तीसाठी सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता रुपये २३५.३० कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता मंजूर अर्थसंकल्पित निधी रुपये १००.०० कोटी वजा जाता रुपये १३५.३० कोटी निधी उपलब्ध करून देण्यासाठी पुरक मागणी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(४) डिझेल तेलावरील मुल्यवर्धित कराची प्रतिपुर्ती या योजनेंतर्गत रायगड जिल्ह्यास सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात २४ कोटी १४ लाख ४२ हजार १३४ रुपये इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. निधी उपलब्धतेनुसार उर्वरित परतावा देण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोनापूर (ता.चामोर्शी, जि.गडचिरोली) येथे कृषी महाविद्यालयाची इमारत व वसतिगृहाच्या बांधकामास निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(२८) * १९३८५ श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनापूर (ता.चामोर्शी, जि.गडचिरोली) येथील कृषी महाविद्यालयाची इमारत व मुला-मुलींच्या वसतिगृहाच्या बांधकामास सन २००९-२०१० या वर्षांत आदिवासी उपयोजनेंतर्गत टप्पा-१ करीता रुपये २९.८२ कोटींची प्रशासकीय मान्यता देण्यात येऊन सदर इमारत व वसतिगृहाचे बांधकाम पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टप्पा-२ साठी रुपये ६३.८६ कोटींचा प्रस्ताव कृ.म.कृ.स.प.पुणे यांनी दिनांक ७ जून, २०१९ रोजी आदिवासी विभागाकडे सादर करुनही अद्याप टप्पा-२ करीता निधी उपलब्ध झाला नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कृषी महाविद्यालयाच्या उर्वरित बांधकामासाठी टप्पा-२ च्या बांधकामाकरीता रुपये ७६.०० कोटींचा सुधारित अंदाजपत्रकीय प्रस्ताव तांत्रिक छाननीसाठी सार्वजनिक बांधकाम परिमंडळ, गडचिरोली यांच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला असून याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर टप्पा-२ च्या रुपये ६३.८६ कोटींचा निधी तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सोनापूर (ता.चार्मोशी, जि.गडचिरोली) महाविद्यालयाच्या उर्वरित बांधकामाचा टप्पा-२ मधील बांधकामाकरीताचा रुपये ७६.०० कोटीचा सुधारित अंदाजपत्रकीय प्रस्ताव तांत्रिक छाननीसाठी सार्वजनिक बांधकाम परिमंडळ, गडचिरोली यांच्या मान्यतेसाठी दिनांक १४/०२/२०२३ रोजी सादर करण्यात आला होता. यासंदर्भात काढण्यात आलेल्या त्रुटींची पुर्तता करण्याच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्यात येत असून याबाबत डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांचेमार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) आदिवासी उपयोजनेतंर्गत सुरु करण्यात आलेल्या डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत सोनापूर, जि.गडचिरोली येथील कृषी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी आदिवासी विकास विभागाच्या मुख्य लेखाशिर्षाखाली ३५, भांडवली मत्तेच्या निर्मितीकरीता अनुदान या नवीन उद्दिष्टाचा समावेश करुन, बांधकामाचा निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव आदिवासी विकास विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## ठाणे व पालघर या जिल्ह्यांमध्ये मत्स्यव्यवसाय शिक्षण व संशोधन संस्था सुरु करण्याबाबत

**(२९) * २०३९९ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व पालघर जिल्ह्यांना ११२ किलोमीटरच्या विस्तीर्ण सागरी किनाऱ्यावरील ८२ गावे ही मत्स्यव्यवसायावर अवलंबून असून मत्स्यव्यवसायाबाबत शिक्षण व संशोधन करणारी संस्था नसल्याने या क्षेत्रातील नवे बदल व आधुनिक पध्दतीची माहिती मच्छिमारांना मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे व पालघर जिल्ह्यात मत्स्यव्यवसाय शिक्षण व संशोधन संस्था सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) पालघर जिल्ह्यात सातपाटी येथे सन १९८३ व वसई सन १९८४ पासून मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र कार्यरत आहे.

ठाणे व पालघर जिल्ह्यातील मच्छिमार युवकांना खोल समुद्रातील मासेमारीचे विविध अत्याधुनिक तंत्रज्ञान व विविध तांत्रिक कौशल्य प्राप्त करण्यासाठी Central Institute of Fisheries, Nautical Engineering and Training (CIFNET), कोची चे उपकेंद्र स्थापन करण्याबाबत प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. त्यानुसार CIFNET, कोची यांच्याकडून संयुक्त सर्वेक्षण करणेबाबत कळविण्यात आले आहे. तद्नंतर प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## पंढरपूर येथील संत उद्यानाचे (तुळशी वृंदावन) निकृष्ट बांधकाम केल्याबाबत

**(३०) * २०४५७ श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाविकांना पंढरपूरमध्ये संत उद्यान पाहण्यास मिळावे यासाठी वन विभागाने पंढरपूरमध्ये सहा कोटी रुपये खर्च करुन तुळशी वृंदावन उभे केले असून, तुळशी वृदांवनात सुमारे चार वर्षापूर्वी बांधण्यात आलेल्या संत चोखामेळा आणि संत एकनाथ महाराजांचे मंदिर दोन महिन्याच्या कालावधीतच कोसळले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी त्यांच्या दिनांक ७ जून, २०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्‌नुषंगाने बांधकामांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे आदेश देण्यात आले आहेत काय, तसेच सदर प्रकरणी संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी मा.जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे आदेशान्वये अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आलेली आहे. वनविभाग, सोलापूर यांचेमार्फत सदर कामाचे स्ट्रक्चरल ऑडीट शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर यांचेकडून करण्यात आले, त्याचा अहवाल प्राप्त झाला आहे. सदर अहवालामध्ये तुळशी वृंदावन येथील ०८ संतांच्या संगमरवरी मंदिर प्रतिकृती व मुर्ती बसविण्यासाठी असणारे चौथरे हे निकृष्ट दर्जाचे असून, यापुढे कोणत्याही प्रकारची संभाव्य हानी टाळण्याकरीता उर्वरित सर्वच संतांच्या मुर्ती संरक्षित ठिकाणी हलविण्यात येऊन संगमरवरी मंदिर प्रतिकृती या पाडण्यात याव्यात असे सुचविण्यात आले आहे. तसेच तुळशी वृंदावन येथे उभारण्यात आलेली भव्य विठ्ठल मुर्तीच्या चौथऱ्याचे देखील काम निकृष्ट दर्जाचे असल्याने विठ्ठल मुर्तीसाठी असुरक्षित असल्याचे नमूद केले आहे.

सदर कामाची चौकशी समितीमार्फत चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच शासन पत्र दिनांक ३०/०६/२०२३ अन्वये उद्यानाचे डिझाईन आणि बांधकामातील त्रुटींची जबाबदारी निश्चित करणे व त्याबाबत करण्यात आलेली कारवाई. तुळशी वृंदावनातील स्थापत्य कामांचे स्ट्रक्चरल ऑडिटचे निष्कर्षानुसार प्रस्तावित उपाययोजना आणि तुळशी वृंदावनाच्या पुनर्विकासासाठी तयार करण्यात आलेल्या आराखड्याबाबत स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यात संत्रा प्रक्रिया उद्योग उभारण्याबाबत

**(३१) * २०५७३ श्री.धीरज लिंगाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात सुमारे ७८ हजार हेक्टरवर संत्रा बागा असून संत्र्यांचे ५ ते ६ लाख टन उत्पादन होत असून बाजारपेठ नसल्याने संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे शासनाने माहिती व निर्णय घेऊन येथे तातडीने संत्रा प्रक्रिया उद्योग उभारणीबाबत तसेच संत्रा विक्रीसाठी बाजारपेठ उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) हे खरे नाही.

अमरावती जिल्ह्यामध्ये १४ तालुक्यांचा समावेश असून या तालुक्यांमध्ये सन २०२२-२३ मध्ये संत्रा पीक लागवडीखाली ७०८३६ हेक्टर जमीन असून संत्र्याचे उत्पादन ५,९५,२२२ मे.टन झाले आहे. तसेच, अमरावती जिल्ह्यात १२ बाजार समित्या कार्यरत आहेत. या १२ बाजार समित्यांमध्ये संत्रा फळपिकासह एकूण १३,०८,५२२ मे.टन शेतमाल आवक झालेला आहे.

(२) पणन मंडळाकडून परदेशात निर्यात करण्यासाठी तसेच इतर राज्यात संत्रा पाठविणे सोयीचे व्हावे याकरीता वरुड येथे संत्रा निर्यात सुविधा केंद्र व चांदूर रेल्वे येथे फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र उभारण्यात आलेले आहे. वरुड येथील निर्यात केंद्रामध्ये प्रि-कुलिंग, कोल्ड स्टोरेज, पॅक हाऊस, ग्रेडींग लाईन या सुविधांचा समावेश आहे. तसेच, मुख्यमंत्री कृषी अन्न प्रक्रिया योजना व प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना या योजनेंतर्गत संत्रा प्रक्रिया प्रकल्पास योजनेतील तरतुदीनुसार अनुदान अनुज्ञेय आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चारकोप, कांदिवली पश्चिम (मुंबई) येथील खाडीजवळ कांदळवनाची कत्तल करुन भुमाफियांकडून अनधिकृत बांधकाम होत असल्याबाबत

**(३२) * १९११९ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चारकोप, कांदिवली (मुंबई) येथील खाडीजवळील कांदळवन नष्ट करून भुमाफियांकडून अनधिकृत व्यावसायिक गाळे व चाळींचे बांधकाम होत असल्याबाबत स्थानिक नागरिकांनी उच्चस्तरीय अधिकाऱ्यांकडे तक्रार करुनही भूमाफियांविरुध्द कोणती कारवाई होत नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यानुषंगाने कांदळवन क्षेत्रापासून ५० मी. च्या बफर झोनमध्ये आढळलेल्या अवैध बांधकामाविरुध्द महसूल विभाग, वन विभाग (कांदळवन कक्ष), बृहन्मुंबई महानगरपालिका व पोलीस प्रशासनामार्फत संयुक्त स्थळ पहाणी करून त्यानुसार आढळून आलेले अतिक्रमण निष्कासीत करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून सदरील भूमाफियांवर व भूमाफियांच्या कारवायांकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच कांदळवनाचे संरक्षण व संवर्धन होण्याकरीता अधिसूचित कांदळवन क्षेत्राच्या हद्दीवर संरक्षक भिंत व तारेच्या कुंपणाचे काम करण्याबाबत तसेच ५० मी. बफर झोनमधील शासकीय मिळकतीस संरक्षक भिंत बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) कांदिवली चारकोप पश्चिम (मुंबई) येथील खाडीजवळील अधिसूचित कांदळवन क्षेत्रात वा ५० मीटर बफर क्षेत्रात कांदळवनाची कत्तल करुन भुमाफियांकडून अनधिकृत व्यावसायिक गाळे व चाळींचे बांधकाम सुरु असल्याचे माहे, एप्रिल २०२३ वा त्यासुमारास निदर्शनास आले नाही.

तथापि, दिनांक २४/०४/२०२३ रोजी दै.लोकमत वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने संयुक्त स्थळपाहणी केली असता चारकोप सेक्टर ८ मधील सर्व्हे क्र. ४१ डी (न.भु.क्र.३) व सर्व्हे क्र. ४२ (न.भु.क्र.२) या क्षेत्रात अनधिकृत बांधकाम दिसून आले. सदर अनधिकृत बांधकामास बृहन्मुंबई

महानगरपालिकेमार्फत नोटीस देण्यात येऊन बांधकाम निष्कासित करण्यात आले आहे. तथापि, एका नोटीसधारकाने नगर दिवाणी न्यायालयामध्ये दावा दाखल केला असल्याने सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

वन विभागाच्या अखत्यारीतील कांदळवन क्षेत्रात अवैध बांधकामे वाढू नये याकरीता गस्ती पथक फिरती करत असतात. चारकोप मध्ये चेन्लिंग फेंन्सिंग व संरक्षण भिंतीचे अंदाजपत्रक तयार करुन संरक्षण भिंत बांधण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कृषी सेवकांच्या मानधनात वाढ करण्याबाबत

**(३३) * १९८५० श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या कृषी विभागाकडून साधारण तीनशे योजना राबविल्या जात असून, सदर योजना लोकाभिमुख करण्यासाठी कृषी सेवक पद निर्माण करण्यात येऊन ६ हजार रुपये मानधनावर कृषी सेवकांची राज्यात नियुक्ती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक वर्षांपासून मानधन वाढविण्यासाठी संबंधित कृषी सेवक कृषी सहाय्यक संघटनेच्या माध्यमातून प्रयत्न करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मानधनवाढीचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या बैठकीत सादर करण्याची कार्यवाही संबंधित विभागाने करण्याचे ठरलेले असताना अद्यापही मानधन वाढीच्या प्रस्तावावर कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कृषी सेवकांचे मानधन वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

वेतनावरील खर्च नियंत्रित करण्याच्या शासनाच्या धोरणाच्या अनुषंगाने कृषी विभागातील कृषी सहाय्यकांची पदे सुरुवातीस कृषी सेवक म्हणून रुपये २५००/- या निश्चित वेतनावर भरण्याचा धोरणात्मक निर्णय सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने या विभागांच्या दिनांक ०६/०२/२००४ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. तसेच याबाबतचे सविस्तर आदेश व मार्गदर्शक सूचना दिनांक १७/०२/२००४ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत.

तद्नंतर दिनांक १९/०३/२०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिनांक ०१/०४/२०१२ पासून कृषीसेवकांच्या निश्चित वेतनामध्ये रुपये २५००/- वरुन रुपये ६०००/- एवढी वाढ करण्यात आली आहे.

कृषीसेवकांच्या निश्चित वेतनामध्ये वाढ करण्याकरीता महाराष्ट्र राज्य कृषी सहाय्यक संघटनेच्यावतीने शासनास निवेदने प्राप्त झाली आहेत.

(३), (४) व (५) होय, हे अंशत: खरे आहे.

कृषी सेवकांच्या निश्चित वेतनामध्ये वाढ करण्याबाबत मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील दिनांक २२/०९/२०२२ रोजी आयोजित बैठकीच्या इतिवृत्तानुसार कृषी सेवकांच्या निश्चित वेतनात वाढ करण्यासंदर्भातील आवश्यक प्रस्ताव मान्यतेसाठी मा.मंत्रिमंडळासमोर सादर करावा असे ठरले आहे. त्यानुसार कृषी सेवकांच्या निश्चित वेतनात वाढ करण्यासंदर्भाने मंत्रिमंडळाच्या मान्यतेकरीता प्रस्ताव तयार करुन सादर करण्यात आला आहे.

-----------------

## राज्यातील बोगस खत विक्रीबाबत

**(३४) * १९०८८ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी, श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये प्रतिबंधित खत व बोगस खत विक्री करून शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या खत विक्रेत्यांविरूध्द ७७ पोलीस ठाण्यात गुन्हे नोंद करण्यात आले असून बोगस खत विक्री प्रकरणी गुजरात येथील कंपनीच्या मालकास १५ दिवसांत अटक करण्यात येईल अशी घोषणा मा.कृषी मंत्री महोदयांनी माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जारगाव (ता.पाचोरा, जि.जळगाव) येथून बनावट रासायनिक खतांचा सुमारे २० लाख रुपयांचा साठा हस्तगत करण्यात आल्याची घटना दिनांक १७ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास घडल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील ७७ पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल केलेल्या दोषी खत विक्रेत्यांना अटक करुन त्यांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत काय, तसेच गुजरात येथील संबंधित कंपनी मालकास अटक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, सदर चौकशीस विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

जारगाव, ता.पाचोरा येथून रुपये २.३८ लक्ष किंमतीचा व राहेनवाडी, ता.जि.जळगाव येथून रुपये १५.४३ लक्ष किंमतीचा खतसाठा तसेच रुपये २.४० लक्ष किंमतीचा किटकनाशकांचा असा एकूण २०.२१ लक्ष किंमतीचा साठा हस्तगत करण्यात आलेला आहे.

(३) अंशत: खरे आहे.

मे.पृथ्वी खेतीबाडी केंद्र, भावनगर, गुजरात कंपनीचे मालकासह ५ व्यक्तींना दिनांक २८/०३/२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे. तसेच, मा.न्यायालयामध्ये दिनांक २६/०६/२०२३ अन्वये दोषारोप दाखल करण्यात आलेले आहे.

(४) होय, राज्यामध्ये गुणनियंत्रण विभागामार्फत जानेवारी, २०२३ अखेर बियाणे-३०, खते-२६, किटकनाशके-२१ असे एकूण ७७ पोलीस केस दाखल करण्यात आलेल्या आहेत.

तसेच, परभणी जिल्ह्यातील मे.राजयोग कृषी केंद्र यांचे घाऊक खत, किरकोळ खत, बियाणे, किटकनाशके असे एकूण ४ परवाने कायमचे रद्द करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे मे.महेश सीड्स ॲण्ड फर्टिलायझर्स, पूर्णा यांचा खत परवाना तसेच, मे.मनोज सीड्स ॲण्ड फर्टिलायझर्स, पूर्णा यांचा खत परवाना निलंबित करण्यात आला आहे. तसेच, मे.पृथ्वीखेतीबाडी केंद्र, भावनगर, गुजरात या कंपनीच्या राज्याच्या खत विक्री परवान्यावर निलंबनाची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर-मुंबई समृध्दी महामार्गाच्या बांधकामासाठी अनधिकृत उत्खनन करणाऱ्या कंत्राटदारावरील कारवाई थांबविल्याबाबत

**(३५) * १९१४१ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्गाच्या बांधकामासाठी वापरण्यात आलेल्या गौण खनिजाबाबत क्षेत्रिय महसूल यंत्रणेमार्फत निर्गमित केलेले सर्व दंडनीय कारवाई आदेश व क्षेत्रिय महसूल यंत्रणेसमोरील दंडनीय कारवाईबाबत सध्या सुरु असलेली सर्व प्रकरणे शासन निर्णय क्र. गौखनि-१०/१२२/प्र.क्र.३७५/ख-२, दिनांक ३ जानेवारी, २०२३ नूसार रद्द करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाची फसवणूक करणाऱ्या कंत्राटदारांवर कारवाई करण्यास स्थगिती देण्याची व यासंदर्भातील दंडनीय कारवाई थांबवून शासनाने कोट्यवधी रुपयांचा महसूल माफ करण्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू कारवाईस दिलेल्या स्थगितीचा निर्णय रद्द करुन अवैधपणे उत्खनन करणाऱ्या संबंधित कंत्राटदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाचे राज्याच्यादृष्टीने महत्व विचारात घेता सदर महामार्गाच्या बांधकामासाठी अनाधिकृत उत्खनन करुन वापरण्यात आलेल्या गौण खनिजाच्या अनुषंगाने क्षेत्रिय महसूल यंत्रणेमार्फत निर्गमित केलेले सर्व दंडनीय कारवाईचे आदेश व क्षेत्रिय महसूल यंत्रणेसमोर दंडनीय कारवाईबाबत सुरु असलेली सर्व प्रकरणे रद्द करणेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने मा.मंत्रिमंडळापुढे सादर केलेल्या प्रस्तावास मंत्रिमंडळाच्या दिनांक १७/११/२०२२ च्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी

महामार्गाच्या बांधकामासाठी वापरण्यात आलेल्या गौण खनिजाबाबत क्षेत्रिय महसूल यंत्रणेमार्फत निर्गमित केलेले सर्व दंडनीय कारवाईचे आदेश व क्षेत्रिय महसूल यंत्रणेसमोर दंडनीय कारवाईबाबत सध्या सुरु असलेली सर्व प्रकरणे रद्द करण्यात आली आहे.

-----------------

## मौजे साबळेवाडी (ता.शिरूर, जि.पुणे) येथील मागासवर्गीय व भूमिहीन लोकांना उपजीविकेसाठी वाटप केलेल्या जमिनीचे निर्वनीकरण केले नसलेबाबत

**(३६)** * **१९९७४ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे साबळेवाडी (ता.शिरूर, जि.पुणे) येथे शासनाने सन १९६९ मध्ये मागासवर्गीय व भूमिहीन लोकांना उपजीविकेसाठी वाटप केलेल्या जमिनीचे निर्वनीकरण केले नसल्याने व सदरच्या जमिनींचा दर्जा राखीव वन असा असल्याने संबंधित शेतकऱ्यांना आता खरेदी विक्री तसेच पतसंस्थांकडून कर्जपुरवठा होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी महसूल विभाग शेतकऱ्यांना खरेदी विक्री तसेच पतसंस्थेकडून कर्जासाठी वन खात्याचे ना-हरकत प्रमाणपत्राची मागणी करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जमिनीचे शासनाने अद्याप निर्वनीकरण न करण्याची कारणे काय आहेत, तसेच संबंधित शेतकऱ्यांना शासकीय सोयीसुविधा मिळण्याबाबत निर्वनीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

सर्वसाधारणपणे सन १९७८ ते १९८४ या कालावधीमध्ये मौजे साबळेवाडी (वाडी विभाजनापूर्वी मौजे टाकळी हाजी), ता.शिरूर, जि.पुणे येथे वन संवर्गातील एकूण १८ हे.७० आर. एवढ्या जमिनी भुमिहिन व्यक्तींना जिल्हाधिकारी, पुणे यांच्यामार्फत वाटप करण्यात आल्या आहेत.

सद्य:स्थितीत गट नं.२३६, २४३, २४५/४ब, २४७ या मिळकतींचे ७/१२ पत्रकी महाराष्ट्र शासन राखीव वन असा शेरा नमूद आहे. याशिवाय सदर जमिनींना पतसंस्थाकडून कर्जपुरवठा होत नसल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) विषयाधीन जमिनींच्या खरेदी विक्री तथा पतसंस्थेकडील कर्जपुरवठा या कारणास्तव महसूल वा वन विभागाकडे ना-हरकत प्रमाणपत्रासाठी मागणी केल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) व (४) महसूल विभागाच्या ताब्यात असलेल्या वन विभागाच्या जमिनी दिनांक ०२/१२/२०१६ च्या परिपत्रकान्वये वन विभागाकडे वर्ग करण्याच्या अनुषंगाने सुचना देण्यात आलेल्या आहेत. प्रस्तुत जमिनीचे निर्वनीकरण झालेले नाही. यास्तव महसूल विभागामार्फत वाटप करण्यात आलेले वनक्षेत्र जमिनींबाबतचे प्रस्ताव वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत शासनास सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, पुणे यांना देण्यात आलेले आहेत.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) तालुक्यात शासकीय आणि वन विभागाच्या जागेतून माती चोरणाऱ्या संबंधितांवर कारवाई करणेबाबत

**(३७) * १९८९९ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यात शासकीय आणि वन विभागाच्या जागेतून माती चोरीचे प्रमाण वाढू लागल्याचे तसेच सदरहू अनधिकृत माती उत्खननामुळे नैसर्गिक संपत्तीचा नाश व शासनाच्या महसूल देखील बुडत असल्याचे दिनांक ३० मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे आणि रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यात शासकीय आणि वन विभागाच्या जागेतून माती चोरणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) व (३) पनवेल तालुक्यात खारकोपर ते गव्हाण या रेल्वे विभागाच्या हद्दीत अनाधिकृत माती उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्याने अज्ञात व्यक्ती विरूध्द न्हावासेवा पोलीस स्टेशन येथे दिनांक १४/०६/२०२३ रोजी गु.र.क्र. ०१३७/२०२३ भा.दं.वि. कलम ३७९ महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४८(७) व खाण आणि खनिज (नियमन आणि विकास) अधिनियम, १९५७ चे कलम १५ व २१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

मौजे कराडे बुद्रुक येथील शासकीय जमीन ग.नं.४७/० मध्ये अनाधिकृतपणे माती उत्खनन केल्याबाबत दिनांक २२/०६/२०२२ रोजी रसायनी पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ००९६/२०२२ भा.दं.वि. कलम ३७९ व ४४७, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४८ व खाण आणि खनिज (नियमन आणि विकास) अधिनियम, १९५७ चे कलम २१ अन्वये अज्ञात व्यक्ती विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच मौजे मोसारे येथील ग.नं.८६ मध्ये वक्क बोर्ड यांची गौण खनिज उत्खनन परवानगीसाठी बनावट NOC सादर करून फसवणूक केल्याप्रकरणी संबंधिताविरूध्द पनवेल शहर पोलीस स्टेशन येथे दिनांक ०६/०२/२०२३ रोजी गु.र.क्र. ००८७/२०२३ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील पिकांचे पंचनामे करताना विमा कंपनीने गैरकारभार केल्याबाबत

**(३८) * १९०६१ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील नैसर्गिक आपत्ती व हंगामातील प्रतिकूल परिस्थितीमुळे नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करताना विमा कंपनीने जवळजवळ ६ तालुक्यातील ११११ पंचनाम्यामध्ये अफरातफर झाली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकसानीचे पंचनामे करताना मूळ पंचनाम्याच्या स्वाक्षरीमध्ये खाडाखोड करणे, बनावट शिक्के तसेच बनावट झेरॉक्स करुन फसवणूक केल्याचे प्रकार घडले आहेत, हे ही खरे आहे काय?
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये एकूण किती प्रकरणामध्ये विमा कंपन्या दोषी आढळून आल्या आहेत, त्यानुषंगाने दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

विमा कंपनीकडून १०४१७ सर्व्हे फॉर्म प्राप्त करुन घेवून तपासणी करण्यात येत आहे. त्यापैकी ५५९८ सर्व्हे फॉर्म तपासून पूर्ण झाले असून ४८१९ सर्व्हे फॉर्म तपासणीचे काम सुरु आहे. तपासणी केलेल्या पंचनाम्यांपैकी २७०७ पंचनाम्यात तफावत आढळून आले आहे. सदर शेतकऱ्यांची यादी सुधारीत Claim देणेबाबत विमा कंपनीकडे सादर करण्यात आलेली होती. सदर २७०७ पैकी ७३० शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर रुपये ५९,९५,४३६ विमा कंपनी व्दारे जमा करण्यात आलेले आहेत. उर्वरीत शेतकऱ्यांना कंपनीकडून पीक विमा लाभ मिळणेची कार्यवाही करण्यात येत आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, चौकशी चालु आहे.

प्रस्तुत प्रकरणी सविस्तर चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हास्तरीय संनियंत्रण समिती यांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील मेळघाट परिसरातील आदिवासी शेतकऱ्यांचे कृषी योजनांबाबतचे १२०० प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(३९) * १९६०२ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील मेळघाट परिसरातील आदिवासी शेतकऱ्यांद्वारे पारंपारिक पिकाच्या उत्पादकता वाढीचे प्रयत्न होत असताना, तब्बल १२०० शेतकऱ्यांचे प्रस्ताव प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या क्रांतीसुर्य बिरसा मुंडा कृषी क्रांती विहीर योजनेंतर्गत सिंचन वाढीसाठी पाईप, कृषीपंप, सौर ऊर्जा पंप, शेतीला लागणाऱ्या साहित्य आधीचा समावेश असून निधीची उपलब्धता वेळेवर होत नसल्याने दुर्गम भागातील शेतकरी या योजनेच्या लाभापासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मेळघाटातील शेतकऱ्यांसाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण योजना व ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत चार लाख रुपये तर बिरसा मुंडा कृषी क्रांती व डॉ. बाबासाहेब आंबेडकर योजनेंतर्गत विहिरीसाठी अडीच लाख रुपये अनुदान मिळते व उर्वरित रक्कम लाभार्थ्यांना स्वत: खर्च करावे लागत असल्याने अनुदान रकमेत वाढ करावी अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, धारणी व चिखलदरा तालुक्यातील आदिवासी शेतकऱ्यांचे सन २०२० ते सन २०२२ या तीन वर्षात बाराशेहून अधिक प्रस्ताव प्रलंबित असताना प्रशासनाकडून लाभार्थी निवडीसाठी नव्याने अर्ज करणाऱ्यांना प्राधान्य देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, त्यानुसार आदिवासी शेतकऱ्यांचे बाराशेहून अधिक प्रस्ताव तात्काळ मंजूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

अमरावती जिल्ह्यातील मेळघाट परिसरातील (धारणी व चिखलदरा तालुक्यातील आदिवासी शेतकऱ्यांनी सन २०२०-२१ ते सन २०२२-२३ या कालावधीत बिरसा मुंडा कृषी क्रांती (टीएसपी) योजनेत विविध घटकाचा लाभ घेण्यासाठी एकूण ५२४७ अर्ज प्राप्त आहेत. त्यापैकी महाडिबीटी पोर्टलव्दारे ऑनलाईन लॉटरीमध्ये १५११ शेतकऱ्यांची निवड झालेली आहे. निवड झालेल्या लाभार्थींपैकी ६१० इच्छुक शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रे पोर्टलवर अपलोड केलेले असून त्यापैकी पात्र ४२४ शेतकऱ्यांना पूर्वसंमती देण्यात आलेली आहे. पैकी ३७० लाभार्थींना विविध घटकांचा लाभ देण्यात आलेला आहे.
(२) बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना (टीएसपी) करीता सन २०२०-२१, २०२१-२०२२ व २०२२-२०२३ या तीन आर्थिक वर्षात निधी उपलब्धता विहित वेळेवर झालेली असून प्रति वर्ष ३ कोटी या प्रमाणे एकूण ९ कोटी निधी प्राप्त झालेला आहे. त्यापैकी सन २०२०-२०२१ मध्ये ३ कोटी, २०२१-२०२२ मध्ये ३ कोटी व २०२२-२०२३ मध्ये २.१४ कोटी असे एकूण ८.१४ कोटी निधी खर्च झालेला असून उर्वरीत कामे प्रगतीत आहेत. परंतु, सन २१-२२ मध्ये महाडिबीटी पोर्टलवर रद्द होणाऱ्या अर्जाचा विचार करता मंजूर निधीच्या जगातील दीडपट लक्षांक पोर्टलवर भरण्यात आला होता.यानुसार ७०९ लाभार्थींची निवड झाली आहे. यापैकी २२५ नविन विहिरीच्या लाभार्थींनी कागदपत्रे अपलोड केल्याने १७५ पात्र लाभार्थींना पूर्वसंमती देवून काम पूर्ण केलेल्या १७० लाभार्थींना अनुदान अदा करण्यात आलेले आहे. जिल्हा परिषद, अमरावती या कार्यालयाकडे प्राप्त निधीच्या मर्यादेत संपूर्ण लाभ देवूनही ५० नवीन विहिरीचे लाभार्थी उपलब्ध निधी पूर्ण खर्च पडल्यामुळे आर्थिक दायीत्व निर्माण होवू नये म्हणून कृषी अधिकारी पंचायत समिती यांचे लॉगीनवर प्रलंबित दिसत आहेत. यासाठी जिल्हा परिषद, अमरावती यांनी अतिरिक्त निधीची मागणी प्रकल्प अधिकारी, धारणी यांचेकडे केलेली आली आहे. सदर प्रलंबित लाभार्थ्यांना सन २०२२-२३ व २०२३-२४ मध्ये उपलब्ध होणाऱ्या निधीतून नवीन विहीर या घटकाचा लाभ देणेबाबत प्राधान्याने कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(३) होय, हे खरे आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या धर्तीवर, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना व डॉ. बाबासाहेब आंबेडकर योजनेंतर्गत नवीन सिंचन विहिरीसाठीचे अनुदान वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) व (५) लाभार्थी निवड ही महाडिबीटी पोर्टलव्दारे सोडतीव्दारे ऑनलाईन पध्दतीने होत असल्यामुळे कार्यालयांचा निवडीमधे कोणताही हस्तक्षेप नाही. वर्षनिहाय निवड झालेल्या लाभार्थी शेतकऱ्यांना नव्याने अर्ज उपलब्ध निधी मर्यादेत लाभ देण्यात येत आहे. सोडतीत निवड न झालेले मागील वर्षातील लाभार्थी व

नव्याने अर्ज केलेले लाभार्थी यांचेमधून पुढील वर्षासाठी आर्थिक लक्षांकाच्या मर्यादेत सोडतीद्वारे ऑनलाईन पध्दतीने निवड केली जात असल्याने नव्याने अर्ज करणाऱ्यांना प्राधान्य देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्ह्यातील कृषी कार्यालयांमधील रिक्त पदे भरण्याबाबत

**(४०) * १९२६१ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील कृषी कार्यालय व इतर तालुका कार्यालयातील मंजूर ७८४ पदांपैकी तब्बल ४१६ पदे रिक्त असल्याने सदरहू रिक्त पदांमुळे कार्यरत कर्मचाऱ्यांवर प्रभारी कामकाजाचा ताण वाढत असल्याची बाब दिनांक ३० मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रत्नागिरी जिल्ह्यातील कृषी कार्यालय व इतर तालुका कार्यालयातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, कार्यालय व अधिनस्त तालुका कृषी अधिकारी कार्यालयांमध्ये ७८४ मंजूर पदांपैकी ३६४ पदे भरलेली असून ४२० पदे रिक्त आहेत. त्यामध्ये तांत्रिक संवर्गाची (महाराष्ट्र कृषी सेवा संवर्ग आणि कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक) ५०९ पदे मंजूर असून यापैकी २९४ पदे भरलेली व २१५ पदे रिक्त आहेत. सरळसेवा व पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासनस्तरावर व विभागीय स्तरावर प्राथम्यक्रमाने सुरु आहे

(२) महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील १४ अधिकाऱ्यांना पदोन्नतीने व २ अधिकाऱ्यांना बदलीने रत्नागिरी जिल्ह्यामध्ये पदस्थापना देण्यात आलेली आहे. तसेच महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब संवर्गातील ५ अधिकाऱ्यांना रत्नागिरी जिल्ह्यात पदोन्नतीने पदस्थापना दिलेली आहे.

तसेच महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षा-२०२१ करीता एकूण २०३ आणि कृषी सेवा परीक्षा २०२२ करीता २१४ पदांकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून परीक्षेची कार्यवाही कार्यान्वित आहे. सदर पदांकरीता उमेदवारांची शिफारस प्राप्त झाल्यानंतर रत्नागिरी जिल्ह्यातील उर्वरित रिक्त पदे भरण्यासाठी प्राथम्यक्रमाने विचार करण्यात येईल.

वित्त विभाग, शा.नि., दिनांक ३१/१०/२०२२ अन्वये ज्या विभागांचा सुधारित आकृतिबंध अंतिम झालेला नाही, अशा विभागांना सरळसेवेच्या कोट्यातील ८० टक्के रिक्त पदे भरण्यास मुभा देण्यात आली आहे. या शासन निर्णयातील तरतूदीनुसार कृषी विभागातील सरळसेवेच्या कोट्यातील उर्वरीत रिक्त पदांची भरती प्रक्रीया राबविण्यात येत आहे. त्यानुसार कोकण विभागातील लिपिक-टंकलेखक संवर्गातील एकूण ६७ पदांची, सहाय्यक अधीक्षक संवर्गातील एकूण ८ पदांची व वरिष्ठ लिपिक संवर्गातील एकूण १८ पदांची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. सा.प्र.वि., शासन निर्णय दिनांक ०१/०२/२०२३ अन्वये अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) पदे निश्चित करण्याचे निकष बदलण्यात आलेले आहेत. त्यानुसार कृषी सहाय्यक संवर्गाची

सुधारित बिंदूनामावली प्रमाणित करुन घ्यावयाची कार्यवाही सुरु असून सदर कार्यवाही होताच कृषी सहाय्यक पदभरतीची पुढील नियमोचित कार्यवाही प्राथम्यक्रमाने करण्यात येईल.

मर्यादित विभागीय परीक्षेच्या अंतिम निकालाच्या आधारे रत्नागिरी जिल्ह्यामध्ये २८ कृषी पर्यवेक्षकांना पदस्थापना देण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## इतर मागासवर्ग व भटक्या विमुक्त प्रवर्गातील विद्यार्थ्यांना पाच वर्षापासून मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती मिळाली नसलेबाबत

**(४१) * २०५०३ श्री.सत्यजीत तांबे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इतर मागासवर्ग व भटक्या विमुक्त प्रवर्गातील इयत्ता पहिली ते दहावी विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून मॅट्रिक पूर्व शिष्यवृत्ती योजना केंद्र शासन व राज्य शासनामार्फत राबविली जात असून देखील उक्त प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षांपासून मॅट्रीकपूर्व शिष्यवृर्ती वितरीत करण्यात आली नसल्याची बाब माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने पाच वर्षांपासून थकीत असलेली शिष्यवृत्तीची रक्कम मिळण्यास पात्र असूनही वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) व (२) नाही.

भारत सरकार मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजनेंतर्गत इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना व डॉ.आंबेडकर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत डिएनटी विद्यार्थ्यांना दिनांक २७/०५/२०१९ पासून शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आली आहे.

सदर योजनेंतर्गत इतर मागास, विमुक्त जाती व भटक्या जमाती या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता सन २०२०-२१ ते २०२१-२२ पर्यंत केंद्र हिस्सा व राज्य हिस्सा मिळून एकूण रुपये ४६.७३ कोटी एवढा निधी वितरीत करण्यात आला असून त्यापैकी रुपये ४६.३६ कोटी इतका निधी खर्च झाला असून ८६८१५५ इतक्या लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे.

केंद्र शासनाच्या सुधारीत मार्गदर्शक सूचनेनुसार इतर मागास, विमुक्त जाती व भटक्या जमाती या प्रवर्गातील शिष्यवृत्ती योजनेच्या प्रमाणात सन २०२२-२३ पासून बदल करण्यात आला आहे. त्यानुसार केंद्र हिस्सा ६०% व राज्य हिस्सा ४०% असे प्रमाण करण्यात आले आहे.

त्यानुसार केंद्र शासनाकडून सन २०२२-२३ व २०२३-२४ मध्ये केंद्र हिस्सा प्राप्त झाला आहे. सदरचा निधी व राज्य हिस्सा खर्च करण्यासाठी योजनेचे स्वरुप बदलल्यामुळे नवीन स्वतंत्र लेखाशीर्ष घेण्यात आले असून सदर बाब विधानमंडळाच्या निदर्शनास आणण्यासाठी जुलै, २०२३ च्या पावसाळी अधिवेशनात पुरक मागणी सादर करण्यात आली आहे. नवीन लेखाशीर्षास विधानमंडळाची मान्यता मिळाल्यानंतरच सदर निधी खर्च करणे शक्य होणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला औद्योगिक वसाहतीतील कृषी खत कंपन्यांवर टाकण्यात आलेल्या छाप्यांबाबत

**(४२) * २००२९ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अंबादास दानवे, श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला औद्योगिक वसाहतीतील कृषी खत कंपन्यांवर कृषी विभागाच्या पथकाकडून छापे टाकण्यात आल्याचे व पथकाकडून अक्षत फर्टीलायझरच्या कंपनी व्यवस्थापनाकडे पाच लाख रुपयांची मागणी केल्याचा आरोप अक्षत फर्टीलायझरच्या व्यवस्थापक श्री.राजेश शिंदे यांनी केल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पथकात कृषी मंत्र्याचे स्वीय सहायक व नागपूर येथील हितेश भट्टड यांचा समावेश असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, तपासणी सुरु असताना पथकातील काही अधिकाऱ्यांनी गोदाम व्यवस्थापकाला दमदाटी करुन आत प्रवेश करुन बायोपेस्टीसाईड व अन्य साहित्यांची नासधूस केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर छापे टाकताना विभागाची परवानगी घेण्यात आली होती काय, असल्यास सदर परवानगी केव्हा देण्यात आली होती, पथकाने जप्त केलेले नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत काय, केव्हा व कोणत्या प्रयोग शाळेत पाठविण्यात आले, त्याचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार अकोला औद्योगिक वसाहतीतील कृषी खत कंपन्यांवर विना परवानगी छापा टाकणाऱ्या तसेच लाच मागणाऱ्या अधिकाऱ्यांसह खाजगी व्यक्तीवर कोणती कारवाई केली, तसेच नमुण्यांबाबत अहवाल प्राप्त झाला असल्यास त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) हे खरे नाही.

एम.आय.डी.सी., अकोला येथील कृषी निविष्ठा साठवणूक केंद्रांची दिनांक ०७/०६/२०२३ ते दिनांक ०९/०६/ २०२३ या कालावधीत तपासणी मोहिम कृषी आयुक्तालयाकडून राबविण्यात आली होती. त्यासाठी तीन गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकाचे एक पथक तयार करुन तपासणी करण्यात आली. तपासणी पथकाकडून व्यवस्थापक, मे.अक्षत फर्टीलायझरच्या कंपनी व्यवस्थापनाकडे कोणत्याही प्रकारची मागणी केल्याबाबतची तक्रार कृषी विभागास प्राप्त झालेली नाही.

(२) हे खरे नाही.

एका तपासणी पथकामध्ये तीन गुणवत्ता नियंत्रक निरीक्षकांचा समावेश असून विविध जिल्ह्यातील कृषी विभागाच्या एकूण ४६ गुणनियंत्रण निरिक्षकांची १४ पथके तयार करण्यात आली होती. कृषी विभागाच्या गुणवत्ता नियंत्रक निरीक्षकांच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तींचा समावेश पथकात करण्यात आलेला नव्हता.

(३) हे खरे नाही.

(४) तपासणी पथकास दिनांक ०६/०६/२०२३ नुसार परवानगी आदेश देण्यात आले होते. तपासणीमध्ये जप्त केलेले किटकनाशकांचे व खतांचे नमूने किटकनाशक व खत चाचणी प्रयोगशाळा, अमरावती व औरंगाबाद येथे दिनांक १२/०६/२०२३ ते दिनांक १४/०६/२०२३ या कालावधीत पाठविण्यात आले होते. सदर प्रयोगशाळांचा अहवाल प्राप्त झाला आहे.

(५) अमरावती विभागातील अकोला जिल्ह्यामध्ये औद्योगिक विकास महामंडळ भागातील कृषी निविष्ठांच्या गोदाम तपासणीकरीता कृषी विभागातील एकूण ४६ गुणनियंत्रण निरिक्षकांच्या तपासणी पथकास दिनांक ०६/०६/२०२३ अन्वये आदेश देण्यात आलेले होते. यामध्ये खाजगी व्यक्तींचा समावेश नव्हता.सदर पथकामार्फत एकूण ५० साठवणूक केंद्रांची तपासणी करण्यात आली. सदर तपासणीमध्ये किटकनाशकांचे १७० नमूने विश्लेषणाकरीता घेण्यात आले होते. यापैकी १४१ नमुन्यांचे विश्लेषण पूर्ण झालेले असून, त्यापैकी १८ नमूने विश्लेषणाअंती अप्रमाणित आढळून आलेले आहेत. तसेच, खतांचे ९ नमूने विश्लेषणाकरीता घेण्यात आले होते, त्यापैकी ५ नमुन्यांचे विश्लेषण पूर्ण झालेले असून पाचही नमूने अप्रमाणित आढळून आले आहेत. उर्वरीत नमून्यांचे विश्लेषण अहवाल अद्याप प्राप्त झालेले नाहीत. यासंदर्भात कायदयातील तरतुदीनूसार उत्पादक/ वितरक/ साठवणूक केंद्र यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली असून न्यायालयीन दावे दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

तसेच, तपासणीमध्ये आढळून आलेल्या उणीवा/ त्रुटींचे अनुषंगाने, एम.आय.डी.सी., अकोला येथे अनधिकृत ठिकाणी विनापरवाना किटकनाशकांची व खतांची साठवणूक व विक्री केल्याने, मे.कर्नाटका ॲग्रो इन्सेक्टिसाईड्स प्रा.लि., बंगलोर व मे.कर्नाटका ॲग्रो फर्टिलायझर प्रा.लि., बंगलोर यांचा, अनुक्रमे ३४११ कि.ग्रॅ. किटकनाशकाचा साठा अंदाजित किंमत रुपये ७.८४ लाख व १,५६९ मे. टन खताचा साठा अंदाजित किंमत रुपये १२.३८ लाख जप्त करण्यात आलेला असून पोलीस स्टेशन, एम.आय.डी.सी., अकोला येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अवैध सावकारांवर कारवाई करण्याकरीता विशेष पथक नेमण्याबाबत

**(४३) * १९३६५ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्ह्यासह राज्यातील उपनिबंधकांनी त्यांच्या परिसरातील अवैध सावकारांवर केलेली कारवाई शोधण्यासाठी विशेष तपास पथक (एस.आय.टी) नेमण्याबाबत लोकायुक्तांनी आदेश दिल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, तदनुषंगाने मा.लोक आयुक्त यांनी दिलेल्या आदेशानुसार अवैध सावकारांवर केलेल्या कारवाईची विशेष तपास पथकाद्वारे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

राज्यामध्ये अवैध सावकारी व्यवसाय व त्याच्या छळवणूकीतून होणाऱ्या शेतकरी आत्महत्या याविषयी केलेल्या कारवाईची चौकशी संदर्भात, मा.लोक आयुक्त यांच्याकडे दिनांक ०५/०४/२०२३ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये विशेष चौकशी समिती (SIT) स्थापन करण्याचे निर्देश शासनास दिले होते. त्यानुसार सहकार आयुक्त व निबंधक, पुणे यांनी शासनास तीन अधिकाऱ्यांची नावे कळविली आहेत. तसेच सदर समितीमध्ये पोलीस खात्यातील अनुभवी अधिकाऱ्याचा समावेश असणे आवश्यक असल्याने अनुभवी अधिकाऱ्याची नियुक्तीसाठी शिफारस करणेबाबत गृह विभागास नस्ती सादर करण्यात आलेली आहे.

मा.लोक आयुक्त यांच्याकडील दिनांक २०/०६/२०२३ रोजीच्या सुनावणीदरम्यान, अवैध सावकारी विरुध्द कारवाई करण्यासंदर्भात शासनाने दिनांक ०१/०३/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये, प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली गठीत त्रिस्तरीय समितीची माहिती व राज्यातील समित्यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती विभागाने सादर केली. तसेच तक्रारदारांच्या तक्रारींच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नंदुरबार यांनी संबंधित दोषींवर सावकारी अधिनियमातील तरतुदींनुसार कारवाई केली असल्याचा अहवाल देखील सादर केलेला आहे. विभागामार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत मा.लोक आयुक्त यांनी समाधान व्यक्त केले असून सदर तक्रार निकाली काढण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कृषी विद्यापीठांमध्ये ज्वारी या पिकावर संशोधन करण्यात येत असल्याबाबत

**(४४) * १९६४८ प्रा.राम शिंदे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा फुले, डॉ.पंजाबराव देशमुख, डॉ.वसंतराव नाईक या कृषी विद्यापीठांमध्ये ज्वारीवर संशोधन करण्यात येत असल्याची बाब माहे मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्वारीच्या आहारामुळे मानवी शरीराला अन्यन्य फायदे होत असून त्यात किमान २८ प्रकारचे आजार व दूर करण्याची क्षमता असल्याचे मत अन्नशास्त्र तज्ञांनी व्यक्त केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्वारीच्या विविध वाणांवर संशोधन करीत असतानाच या पिकावर येणाऱ्या रोगाचे नियंत्रण करून रोगमुक्त ज्वारीचे वाण शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी या कृषी विद्यापीठात ज्वारी या पिकावर संशोधनाचे कार्य करण्यात येत आहे.

(२) हे खरे आहे.

ज्वारीतील विविध अन्न घटकांमुळे ज्वारी विविध रोगांवर उपचारात्मक उपयोगी ठरु शकते. तथापि, आजार दूर करण्यासंदर्भात ज्वारी आहाराबाबत कृषी विद्यापीठांमध्ये संशोधन झालेले नाही.

(३) राज्यात राष्ट्रीय अन्न व पोषण सुरक्षा अभियान ३१ जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. याव्यतिरिक्त आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षाच्या अनुषंगाने सन २०२२-२३ व २०२३-२४ मध्ये राष्ट्रीय कृषी विकास योजनेच्या अंतर्गत महाराष्ट्र मिलेट मिशन ३४ जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. या अंतर्गत ज्वारीच्या लागवडीसाठी पीक प्रात्यक्षिके, बियाणे वितरण, शेत तिथे पौष्टिक तृणधान्य मिनिकीट, ह्या बाबी राबवून शेतकऱ्यांना ज्वारी पिकाचे बियाणे अनुदानावर/ मोफत वितरीत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जे.एन.पी.टी., नवी मुंबई येथील कांदळवन क्षेत्रातील खारफुटी नष्ट होण्याचा धोका निर्माण झाल्याबाबत

**(४५) * १९७८५ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जे.एन.पी.टी., नवी मुंबई येथील हजारो कांदळवन क्षेत्रातील खारफुटी नष्ट होण्याचा धोका निर्माण झाल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने नेमलेल्या कांदळवन समितीने जेएनपीटीला एक लाखाचा दंड ठोठावला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जे.एन.पी.टी.तील कंटेनर टर्मिनल-४ साठी भराव टाकताना खारफुटी व पाणथळ जागा नष्ट होत असून सदर प्रकरणी प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पर्यावरणाचे होणारे नुकसान थांबवण्यासाठी कांदळवने संरक्षित करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१), (२), (३) व (४) जे.एन.पी.टी., नवी मुंबई यांच्याकडून दिनांक १३/०९/२०२२ रोजी ८१४.३५ हेक्टर क्षेत्र वन विभागाच्या ताब्यात घेण्यात आलेले असून सदर वन विभागाच्या ताब्यातील कांदळवन क्षेत्रामध्ये कोणत्याही प्रकारची खारफुटीची तोड झालेली नाही.

मा.उच्च न्यायालयाने नेमलेल्या सचिव स्तरावरील समिती किंवा विभागीय आयुक्त कोकण स्तरावरील समिती यांच्याकडून जे.एन.पी.टी.ला एक लाखाचा दंड ठोठावला नाही. त्याचप्रमाणे जेएनपीटीतील चौथ्या कंटेनर टर्मिनलचा टप्पा-II साठीचा भराव हा समुद्राच्या अंतर भरती क्षेत्रात आहे. तसेच कांदळवन ५० मीटर पेक्षा जास्त अंतरावर आहे.

कांदळवन संरक्षणासाठी १८४ महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या कर्मचाऱ्यांची नेमणूक केली असून ६.५० कि.मी. ची संरक्षक भिंत/चेन्लिंग फेन्सिंग चे काम करण्यात आले आहे. कांदळवन क्षेत्रात निगराणी करण्यासाठी सीसीटीव्ही बसविण्यासाठी शासन पत्र दिनांक २८/०४/२०२२ अन्वये प्रकल्प सल्लागार

यांच्या नियुक्तीस मान्यता देण्यात आली आहे. कांदळवनाबद्दल लोकांमध्ये जनजागृती करण्यासाठी विविध कार्यक्रम कांदळवन कक्षामार्फत राबविण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यात मुकादमांकडून ऊस वाहतूकदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याबाबत

**(४६) * १९७२४ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील ऊस वाहतूकदारांकडून लाखो रुपये ॲडव्हान्स घेऊन मुकादमांनी फसवणूक केल्याबाबत जिल्ह्यातील विविध ठिकाणी गुन्हे दाखल झाल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुकादमांकडून ऊस वाहतूकदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने फसवणूक करणाऱ्या मुकादमांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१), (२) व (३) कोल्हापूर जिल्ह्यातील कोणत्याही कारखान्यांच्या कार्यक्षेत्रातील ऊस गाळपा अभावी शिल्लक राहिलेला नाही. तथापि, फसवणुकीच्या तक्रारीच्या अनुषंगाने कोल्हापूर जिल्ह्यामध्ये एकूण ६७१ गुन्हे नोंद करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वांगी (ता.कडेगाव, जि.सांगली) येथील गौण खनिजाचे अनधिकृत उत्खनन होत असल्याबाबत

**(४७) * १८८५३ श्री.अरुण लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वांगी (ता.कडेगाव, जि.सांगली) येथील परिसरात अनेक दिवसांपासून गौण खनिजाचे उत्खनन आणि त्याची बेकायदेशीर वाहतूक होत असल्याने गौण खनिज व साहित्य महसूल विभागाच्या परवानगीशिवाय अन्यत्र हलविणे हे बेकायदेशीर असल्याने त्यावर देखरेख ठेवण्यासाठी शासनाने अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्त केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गौण खनिज व साहित्याच्या बेकायदेशीर वाहतुकीमुळे शासनाचा महसूल (स्वामित्व धन) बुडविण्यात येत असून यामध्ये संबंधित शासकीय अधिकारी सामील असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार शासनाने संबंधित अधिकारी व कर्मचारी तसेच बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) तहसिलदार कडेगाव, जि.सांगली यांचेकडून अनधिकृत गौणखनिज वाहतूक/उत्खनन होणार नाही यासाठी गस्ती पथक नेमण्यात आलेली आहेत.

कडेगाव तालुक्यामध्ये गौणखनिजाचे उत्खनन व त्याची बेकादेशीर वाहतूक रोखण्यासाठी १ एप्रिल, २०२२ ते २६ जून, २०२३ या कालावधीत मौजे वांगी हद्दीमध्ये अनधिकृत गौणखनिजाच्या वाहतूक/ उत्खनन/साठ्याच्या एकूण १६ प्रकरणी रुपये ७९,९१,७६९/- ऐवढ्या रकमेची दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

-----------------

## पालघर जिल्ह्यात मजगी (बांध) च्या प्रकल्पासाठी शेततळी खोदण्यावर कोट्यवधी रुपयांचा खर्च झाल्याबाबत

**(४८)** * **२०२८६ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यात कृषी विभागांतर्गत मजगी (बांध) च्या प्रकल्पासाठी शेततळी खोदण्यात आली असून त्यासाठी कृषी विभागाने प्रत्यक्षात कामे न करता १४ कोटी रुपयांचा निधी खर्च केला असल्याबाबत मा.पालकमंत्री, पालघर जिल्हा यांनी चौकशी करण्याचे आदेश कृषी विभागाला दिले असल्याचे माहे मार्च, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पालघर जिल्ह्यात कृषी विभागांतर्गत राबविण्यात आलेल्या योजनानिहाय शेततळे तपासण्याचे काम हाती घेऊन या योजनेच्या कामाची सखोल चौकशी करण्याबाबत मागणी 'समर्थन' संस्थेने मा.मुख्यमंत्री, मा.कृषी मंत्री, मा.प्रधान सचिव (कृषी विभाग), यांच्याकडे दिनांक २९ मे, २०२३ वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) समर्थन संस्थेचे सदर निवेदन आयुक्त (कृषी) यांना दिनांक १२/०७/२०२३ च्या पत्रान्वये पाठविण्यात आले असून सदर प्रकरणी प्राथमिक चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर विभागातील सिंचन विहिरींच्या कामाकरिता आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४९) * १९६३१ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विभागातील सिंचन विहिरीच्या धडक कार्यक्रमांतर्गत १३००० सिंचन विहिरी बांधकाम करण्याचे लक्ष्य निर्धारीत करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर जिल्ह्यातील ५०००, भंडारा १५००, गोंदिया ११००, चंद्रपूर १७०० गडचिरोली १७०० व वर्धा २००० सिंचन विहिरींचा लक्ष्यांक दोन्ही वर्षे एकत्रीत प्रमाणे निर्धारीत करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संपूर्ण विभागात २५६८ सिंचन विहिरींची कामे सुरू असून निर्धारीत लक्ष्यामधील फक्त १२१९ विहिरींची कामे पूर्ण करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिलेला लक्ष्यांक विभागवार पुर्ततेकरीता २१७३४ लक्ष रुपये निधी सिंचन विहिरी बांधकाम करण्याकरीता लागणार असून, याबाबतचा प्रस्ताव दिनांक १० मार्च, २०२३ रोजी उप मुख्य कार्यकारी अधिकारी, रोहयो विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर यांनी सादर केलेला असून, अद्यापही निधीची मंजुरी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नागपूर विभागात दिलेले सिंचन विहिरींचे लक्ष्यांक पूर्ण करण्याबाबत तथा सिंचन क्षमतेत वाढ करणेबाबत आवश्यक निधीची मंजुरी तातडीने देवून निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१), (२), (३) व (४) होय, हे खरे आहे.

(५) सदर योजनेंतर्गत आत्तापर्यंत पूर्ण झालेल्या विहिरींच्या कामांकरीता टप्प्याटप्प्याने निधीच्या उपलब्धतेनुसार रुपये ९३.०० कोटी इतका निधी वितरित करण्यात आलेला आहे. सन २०२३-२४ वित्तीय वर्षाकरीता रुपये ६०.०० कोटी इतकी अर्थसंकल्पित तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच कामाच्या प्रगतीनुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्ह्यातील गिरणा नदीपात्रामधून अनधिकृत वाळू उपसा होत असल्याबाबत

**(५०) * २०३३९ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या नव्या वाळू धोरणानुसार वाळू उपसावर बंदी घातली असूनही जळगाव जिल्ह्यातील गिरणा नदीपात्रातून अनिर्बंध वाळू उपसा होत असून अनधिकृत वाळू उपसा करणारे डंपर, ट्रॅक्टर शहरातील पोलीस स्टेशनच्या परिसरातूनच वाहतूक करीत असल्याचे व गिरणा नदीपात्रात एकाच वेळी शंभरहून अधिक ट्रॅक्टर, डंपर असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुक्यातील अनेक गावातून अनधिकृतरित्या वाळू उपसा केला जात असूनही गावातील ग्रामपंचायती प्रशासन, सरपंच यांच्याकडून कोणत्याही प्रकारे विरोध होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गिरणा नदीपात्रातील होत असलेल्या या अनधिकृत वाळू उपसाबाबत संबंधित दोषी अधिकारी तसेच दोषी कंपन्यांविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) गिरणा नदीपात्रातून तुरळक स्वरुपात वाळू चोरीच्या घटना निदर्शनास आल्यामुळे नदीपात्रापासून गावाकडे जाणारे रस्ते जेसीबीच्या सहाय्याने चर खोदून बंद करण्यात आले आहेत. अवैध गौण खनिज व वाहतूकीची माहिती नागरिकांकडून जिल्हा प्रशासनाला कळविण्याबाबत हेल्प लाईन सुरु केली आहे.

गिरणा नदीवरील रेल्वे ब्रिज व राष्ट्रीय महामार्ग क्र.६ च्या पुलापासून ६०० मीटरचा परिसर उपविभागीय दंडाधिकारी यांनी प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित केला आहे.

जळगाव जिल्ह्यातील गौण खनिजाच्या अवैध उत्खननास व वाहतूकीस आळा घालण्यासाठी महसूल, परिवहन व पोलीस यांच्या संयुक्त पथकामार्फत तसेच ग्रामपंचायतीमार्फत वेळोवेळी कारवाया करण्यात येतात.

जळगाव जिल्ह्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणी दिनांक ०१/०४/२०२३ ते दिनांक ३०/०६/२०२३ एकूण १७७ वाहनांवर कारवाई करुन २,२४,५३,०००/- इतका दंड आकारुन २२ प्रकरणी गुन्हे दाखल केले आहेत.

-----------------

## बोरीचक (ता.आरमोरी, जि.गडचिरोली) ग्रा.प. अंतर्गत बोरी येथील तलावाचे खोदकाम होऊनही कॉंक्रिटीकरण न झाल्याबाबत

**(५१) * १९३६२ श्री.रामदास आंबटकर, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आरमोरी (जि.गडचिरोली) तालुक्यात बोरीचक ग्रा.प. अंतर्गत बोरी येथील तलावाच्या पाटाचे खोदकाम ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत होऊन ३ वर्षांचा कालावधी उलटूनही सदर पाटाचे कॉंक्रिटीकरण प्रलंबित असल्याचे दिनांक २३ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर पाटाचे कॉंक्रिटीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) मा.मा.तलाव ख.क्र.२१८ विशेष दुरुस्ती व नहर कॉंक्रिटींगचे काम तांत्रिक मान्यता क्रमांक ०३/२०१९ दिनांक २९/०८/२०१९, प्रशासकीय मान्यता क्रमांक १९/२०२० दिनांक १५/०१/२०२० अन्वये मंजूर करण्यात आलेले आहे. सदर काम दिनांक २५/०२/२०२१ ला सुरु करण्यात आलेले आहे.

जिल्हा परिषद (ल.पा) उपविभाग वडसा जिल्हा गडचिरोली यांच्याकडून सदर काम पूर्ण करण्याबाबत पाठपुरावा सुरु आहे. रोहयो दरसुचित वाढ झाल्यामुळे कामाचे सुधारीत अंदाजपत्रक मंजूर करुन काम पूर्ण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

खालील कारणांमुळे काम पूर्ण होण्यास विलंब झालेला आहे.

१) सदर काम सुरु झाल्यानंतर कोविड-१९ या रोगाची दुसरी लाट सुरु झाली त्यामुळे काम थांबवावे लागले.

२) तालुक्यातील रेती घाटाचे लिलाव न झाल्यामुळे बांधकामास वेळीच रेती मिळू शकली नाही.

३) सदर तलावाच्या पाण्यावर खरीप व रब्बी पीक घेत असल्यामुळे काम करणे अडचणीचे होते. त्यामुळे वेळेत काम पूर्ण होऊ शकले नाही.

-----------------

## मुंबईतील गिरगाव येथे “मराठी नाटयविश्व” या नाटयगृहाच्या उभारणीबाबत

**(५२) * १९१३४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासन आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून गिरगाव (मुंबई) येथील बिर्ला क्रीडा केंद्राचा पुनर्विकास करुन “मराठी नाटयविश्व” नाट्यगृह तसेच रंगभूमी संग्रहालयाची इमारत उभारली जाणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एक वर्ष होऊनही या प्रकल्पाबाबत मंजूरी व निधीचा प्रस्ताव प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हा प्रकल्प सुरु करण्यासाठी शासनाने निधीची तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) बिर्ला क्रिडा केंद्र वास्तुचा पुनर्विकास व मराठी रंगमंच कलादालन निर्मिती करीता दिनांक २६ मार्च, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेस रुपये १०.०० कोटी निधी मंजूर करण्यात आलेला असून सदर केंद्राचा पुनर्विकास शासकीय निधीतून तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्वनिधीतून पूर्ण करण्यात येणार आहे.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यातील ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५३) * १९०६३ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामांमध्ये भामरागड, मुलचेरा आणि अहेरी येथे भ्रष्टाचार झाल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी चौकशी समिती नेमली असल्याचे माहे एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भामरागड तालुक्यामध्ये २० लाख रुपयांच्या कामाची मंजूरी असताना गटविकास अधिकाऱ्यांनी १.६५ कोटी रुपयांचे काम करून देयके मंजूर केली आहेत, तसेच मुलचेरा येथे २.४० कोटी रूपयांचा निधी मंजूर असताना १३ कोटी ४० लाख रुपयांची कामे करून निधीचा अपहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सहा सदस्यीय समितीच्या अहवालानुसार गटविकास अधिकारी, ग्रामसेवक, विस्तार अधिकारी, शाखा अभियंता, तांत्रिक अधिकारी असे एकूण २३ अधिकारी या प्रकरणामध्ये दोषी आढळून आले असतानाही त्यांच्यावर अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी करुन या प्रकरणातील संबंधित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) सदर प्रकरणी प्राप्त झालेल्या चौकशी अहवालनूसार भामरागड, अहेरी व मुलचेरा तालुक्यातील संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना अनियमिततेसाठी जबाबदार धरण्यात आले आहे. प्रस्तूत प्रकरणी सखोल चौकशीच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. त्यानुसार पुढील प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच प्रकरणातील भामरागडचे गटविकास अधिकारी यांच्यावरील शिस्तभंगविषयक कारवाई करण्याकरीता विभागीय आयुक्त, नागपूर यांच्याकडे दोषारोप पत्र सादर करण्यात आले आहे.

या प्रकरणी जबाबदार असलेल्या तीन ग्रामसेवक यांना निलंबित करण्यात आले आहे. त्यांच्यासह एक शाखा अभियंता व उर्वरित चार ग्रामसेवक यांच्यावर विभागीय चौकशीची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. प्रकरणात एक गटविकास अधिकारी, दोन कनिष्ठ अभियंता, दोन विस्तार अधिकारी व दोन सहायक लेखा अधिकारी यांचेवर प्रचलित नियमानुसार प्रशासकीय कारवाई करण्यात आली आहे आणि एक तांत्रिक सहायक (कंत्राटी) यांची सेवा समाप्ती करण्याची कार्यवाही सुरू आहे व एक तांत्रिक सहायक (कंत्राटी) यांना दंडाची शिक्षा करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बारसू (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील कातळशिल्पांचे जतन व संवर्धन करण्याबाबत

**(५४) * १९३३४ श्री.अंबादास दानवे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बारसू (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील कातळशिल्पासह एकूण नऊ ठिकाणची कातळशिल्पे "युनेस्को" च्या जागतिक वारसास्थळांच्या तात्पुरत्या यादीत समाविष्ट करण्यात आली असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ऐतिहासिक पुरातन वास्तुंचे जतन व संवर्धन करण्याकरीता प्राधान्याने लक्ष देण्याची आवश्यकता असल्याने तसेच हेरिटेज वर्गात मोडणाऱ्या वास्तूंच्या ठिकाणी अन्य कोणतेही प्रकल्प राबविण्यावर बंधने असूनदेखील प्रस्तावित तेलशुध्दीकरण प्रकल्पामुळे बारसूच्या सड्यावरील सुमारे १७० कातळशिल्पे धोक्यात आली असल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, तदनुषंगाने कातळशिल्पांचे जतन आणि संवर्धन करण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) रत्नागिरी जिल्ह्यातील ७, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील १ आणि गोवा राज्यातील फणसाईमाळ अशी एकूण ९ ठिकाणची कातळशिल्पे "यूनेस्को" च्या वारसास्थळांच्या तात्पुरत्या यादीत समाविष्ट करण्यात आली आहेत. यामध्ये बारसू येथील ३ कातळशिल्पांचा समावेश आहे.
(२) पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाने बारसू येथील गावात केलेल्या आतापर्यंतच्या सर्वेक्षणात ६२ कातळशिल्पांची बारसूच्या सड्यावर नोंद केलेली आहे. बारसू येथील कातळशिल्पे असलेली जमीन भुसंपादनाच्या प्रस्तावातून वगळण्यात येणार आहे.
(३) चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. रत्नागिरी जिल्ह्यातील १७ ठिकाणच्या कातळशिल्पांचे जतन, संवर्धनाचे काम निविदास्तरावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे येथील कृषी विभागातील लिपिक संवर्गाच्या विविध मागण्या मान्य करण्याबाबत

**(५५) * १९६६३ प्रा.राम शिंदे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील महाराष्ट्र राज्य कृषी विभाग लिपिक संवर्ग संघटनेच्यावतीने कृषी आयुक्तालय सेंट्रल बिल्डिंग येथे धरणे आंदोलन केले असल्याची बाब माहे मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृषी विभागामध्ये कृषी आयुक्तालय लेखा परिक्षण स्वतंत्र कक्ष तयार करून त्यामध्ये लिपिक संवर्गीय पदे नेमणे तसेच कृषी विभागातील लिपिक पदे कमी न करणे, रिक्त पदांची भरती करणे, पदोन्नती करणे, सेवाप्रवेशोत्तर परीक्षा वर्षात दोनदा घेणे अशा विविध मागण्या अनेक महिन्यांपासून प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कृषी विभागातील लिपिक पदाच्या विविध मागण्या पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) महाराष्ट्र राज्य कृषी विभाग लिपिक संवर्ग संघटना, पुणे यांनी लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत कृषी आयुक्तालय, सेंट्रल बिल्डिंग, पुणे येथे दिनांक १०/०५/२०२३ पासून धरणे आंदोलन करणेबाबत दिनांक १७/०४/२०२३ रोजी दिलेल्या नोटीसीच्या अनुषंगाने कृषी आयुक्तालय स्तरावर संघटनेच्या प्रतिनिधींसमवेत सकारात्मक चर्चा करण्यात आली. सदर चर्चेनंतर संघटनेने आंदोलन स्थगित केले.

(२) व (३) कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय दिनांक २२/०५/२००९ अन्वये सुधारीत केलेल्या आकृतिबंधानुसार कृषी आयुक्तालयांतर्गत लेखा-२ शाखेमध्ये लेखा परीक्षणासाठी स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात आला असून त्यामध्ये लिपिकवर्गीय पदे मंजूर करण्यात आलेली आहेत.

कृषी विभागाच्या प्रस्तावित सुधारीत आकृतिबंधामध्ये कृषी विभागातील संगणकाचा वापर, योजनांची व्याप्ती इत्यादी बाबींचा सारासार विचार करुन तसेच लिपिक संवर्गातील पदोन्नतीच्या संधींचा विचार करुन लिपिक संवर्गातील पदे प्रस्तावित करण्यात आली आहेत.

सन २०२१ च्या मागणीपत्रानुसार महाराष्ट्र कृषी प्रशासकीय सेवा संवर्गातील एकूण २४ पदांकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून परीक्षेची कार्यवाही कार्यान्वित आहे. तसेच वित्त विभाग, शासन निर्णय, दिनांक ३१/१०/२०२२ अन्वये ज्या विभागांचा सुधारीत आकृतिबंध अंतिम झालेला नाही, अशा विभागांना सरळसेवेच्या कोट्यातील ८० टक्के रिक्त पदे भरण्यास मुभा देण्यात आली आहे. त्यानुसार कृषी विभागातील लिपिक-टंकलेखक संवर्गाकरीता एकूण ३७९ पदांकरीता तसेच लिपिक वर्गीय संवर्गातील उर्वरीत २१८ पदांकरीता दिनांक ०५/०४/२०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

कृषी विभागातील दुय्यम सेवेतील कर्मचाऱ्यांसाठी सेवाप्रवेशोत्तर परीक्षा वर्षातून किमान दोन वेळा घेण्याचे नियोजन केले असून त्यानुसार जुलै/ऑगस्ट, २०२३ मध्ये पुढील परीक्षा घेणे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रोजगार हमी योजनेच्या किमान वेतन कायद्यानुसार मजुरांच्या रोजंदारी दरात वाढ करण्याबाबत

**(५६)** * **२०३३५ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारने रोजगार हमी योजनेच्या किमान वेतन कायद्यानुसार महाराष्ट्र राज्यात रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून मजुरांच्या रोजंदारी दरात वाढ करून देण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोजगार हमी योजनेतून २०२३ मध्ये केंद्र सरकारने वाढत्या महागाईच्या दृष्टीने केवळ १७ रुपयांची वाढ केली असून केंद्र सरकारने रोजगार हमी योजनेची मजूरी वाढवून देण्याबाबत ‘समर्थन’ संस्थेने शासनाकडे दिनांक १९ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणासंदर्भात घेण्यात आलेल्या निर्णयाचे स्वरूप काय आहे व त्याअनुषंगाने किमान वेतन कायद्यानुसार रोजगार हमी योजनेच्या मजूरीत वाढ करून व इतर लाभ देण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही केंद्र शासन पुरस्कृत योजना आहे. केंद्र शासनामार्फत अनुज्ञेय करण्यात आलेल्या कामांचा समावेश या योजनेमध्ये करण्यात येतो. सदर योजनेंतर्गत प्रत्येक जॉबकार्ड धारकाला रोजगाराची हमी दिली जाते. केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाच्या अधिसूचनेद्वारे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत राज्य/संघराज्य निहाय अकुशल मजूरी दर प्रत्येक आर्थिक वर्षात सुधारीत/निश्चित केले जातात. केंद्र शासनाने सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता निश्चित केलेले अकुशल मजूरी दर दिनांक २४ मार्च, २०२३ अन्वये राजपत्रात प्रसिध्द केले आहेत. त्यानुसार सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता महाराष्ट्र राज्याकरीता रुपये २७३/- इतका अकुशल मजूरी दर निश्चित केलेला आहे. तसेच मजुरांना कामावर पिण्याचे पाणी, प्राथमिक उपचार व बरोबर आणलेल्या ६ वर्षाखालील लहान मुलांना सांभाळण्याची सोय, कामाच्या अनुषंगाने मजूरास वा बरोबर आणलेल्या लहान मुलास दुखापत झाल्यास रुग्णास सर्व रुग्णसेवा शासकीय खर्चाने व दैनिक मजूरीच्या ५० टक्के पर्यंत रक्कम सानुग्रह रुग्ण भत्ता, अपंगत्व वा मृत्यू आल्यास रुपये ५०,००० पर्यंत सानुग्रह अनुदान, प्रसुती रजा व कुटुंब नियोजनाकरीता सवलती दिल्या जातात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**<br>**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**<br>**सचिव-१ (का.),**<br>**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.